# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XVIII AKOLA MONDAY DECEMBER I 1884 NO 46

वर्ष १८ अकोला सोमवार तारीख १ माहे ४नोवेंबर सन १८८४ इ० अंक ४६



## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| तीची आगाऊ | ५ |
| सहामाही ,, | ३ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांक हांशील. | |
| वर्षाचें आगाऊ | ०१३ |
| सहामाही | ०८ |
| साल अखेर | १०८ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी यावी आणखी[illegible] केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्रिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०३ |

## तयार आहे.

### हिंदुधर्म शास्त्र- भाग १ व २

(दुसरी आवृत्ति)

नामदार रा. सा. वि. ना. मंडलीक सी. एस आय० यांचें

किंमत ८ रुपये व हांशील आठआणे. पत्रें (किंमतीसुद्धां) ग्रंथकार यांस मुंबईस पाठवावीं.

सदरील पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीसाठीं ठेविलीं आहेत. व० स० कर्ते

## स्त्री पुरुष तुलना.

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया?

हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदेयांनीं रचिला आहे. पुस्तकें पुणें येथें श्रीशिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें एथील रा० रा० बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क मि० डे० कमिशनर यांजकडेस व अकोलें एथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे पुस्तक घेणारांस टपालहसील पडणार नाहीं. पैसे पाठविणारानें वर्तांळ्या सुद्धां पाठवावे.


वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध १४ शके १८०६

## ब्रिटिश सरकारचें राज्य.

(मागील अंका वरून पुढें चालूं)

हें उघड दिसतें कीं इंग्लंडांतलि प्रजेवर दरमाणसी १ पौंड १ शि. ४ पेन्स मात्रं कर आहे व तो फार जबर आहे असेंही म्हणतां येत नाहीं. ह्या महाराष्ट्रासंबंधीं विशेष वर्णनीय गोष्ट ही आहे कीं त्याच्या विस्ताराच्या मानानें त्यांतलि फौजेची संख्या फारच कमी आहे व ती परराष्ट्रांपासून संरक्षण करण्यास व राष्ट्रांतील शांतता राखण्यास पुरेशी आहे. ह्या गोष्टीचे संबंधानें तर ह्या राष्ट्राची बरोबरी इतर कोणत्याही राष्ट्राच्यानें करवत नाहीं, व ह्यासंबंधानें ह्याच्या खर्चाचें मान अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानें खेरीज करून पृथ्वीवरील इतर कोणत्याही देशापेक्षां फार कमी आहे. परंतु अमेरिकेंतील कांहीं गोष्ट अगदीं निराळ्या आहेत म्हणून ह्या व दुसऱ्या संबंधानें त्या देशाची ह्या देशाशीं तुलना करणें अगदीं वाजवी नाहीं. इंग्लंड देशाचे समुद्र संबंधीं वर्चस्व इतकें आहे कीं नौकाविद्येंत पृथ्वी वरील सर्व देशांत आज त्याचीच वरचढ आहे. ह्या त्याच्या अशा नौका ज्ञानाचें पुण्यानेंच त्यानें जगांतील एकंदर व्यापाराचा तिसरा हिस्सा आटोपला आहे. सर्व पृथ्वीवर वाफेच्या योगानें जो माल नेला जातो त्याचा अर्धामाल, माल वाहून नेण्याचीं जीं साधनें आहेत त्यापैकीं अर्धीं साधनें, सर्व राष्ट्रांचे मिळून जें गलबतांचें भाडें वसूल होतें त्यापैकीं अर्धें भाडें ह्या राष्ट्राचे असून सर्व पृथ्वी वरील गलबतें बांधण्याच्या कामा पैकीं दोन तृतियांश काम ह्या राष्ट्रांत होतें [illegible] च सर्व जगांतलि पेढीच्या कामाचा एक तृतियांश काम या एका राष्ट्रांत होतें. जमीन गुरें ढोरें, आगगाड्या, लोकोपयोगीं कामें, इमारती, निरनिराळ्या प्रकारचें सामान, तारवें, व्यापाराचे जिन्नस, सोनेंचांदी वगैरे मौल्यवान् धातु, जवाहीर आणि दुसरे आणखी कित्येक पदार्थ ह्यांचे संबंधानें ब्रिटिश सरकारचें राज्य सर्व पृथ्वींत मोठें आहे. कलाकौशल्याचें कारखाने व इतर उद्योग ह्यांत जरी अद्याप त्या राष्ट्राचें वर्चस्व आहे तरी अमिरिकेंतील स्वतंत्र संस्थानें आतां त्या संबंधानें हळु हळु पुढें येऊं लागलीं आहेत. विद्येच्या कामांत ते राष्ट्र स्वाभाविकतःच अग्रणी नाहीं कारण ह्या राष्ट्रांतील शिकणारांची संख्या जरी पुष्कळ मोठी आहे तरी ती एकंदर लोकसंख्येच्या मानानें फार थोडी आहे. ह्याचें कारण असें आहे कीं हिंदुस्थानांत विद्येचा प्रसार फार कमी आहे आणि तेथें अलिकडील वीस वर्षांत जरी तिचा प्रसार एकसारखा ज्यास्त ज्यास्त होत चालला आहे तरी पुष्कळ शतकांपासून त्या देशांत तिची उपेक्षा झाली असल्यामुळें आतां तिचें मान चांगलें होण्यास बराच काळ पाहिजे असें सर रिचर्ड टेंपल साहेब ह्मणतात.

सन १८८३-८४ सालांत ९२,७०,३२,३२८ रुपयांचा जिन्नस व १२,८७ ७९,६३३ रुपयांचा खजिना मिळून एकंदर ६५,५८,११,९६१ रुपयांचा माल हिंदुस्थानांत बाहेरून आला. व बाहेरगांवीं पाठविलेला माल नेहमीं प्रमाणें अधीक ह्मणजे ८९,०१,४८,९७८ रुपयांचा होता; त्या पैकीं ८५,००,८७,३९४ रुपयांचा देशांतील माल असून ३,०२,६३,८९७ रुपयांचा बाहेरील आलेला माल होता व ९७, ९७,५,८७ रुपयांचा खजिना होता. अशी ह्या सालांत एकंदर १,९४,५९,६०,९३९ रुपयांची उलाढाल झाली. ह्यावरून असें दिसतें कीं हिंदुस्थानांतील व्यापाराची उत्तरोत्तर चढती कळा आहे. सन १८७९-८० सालां पेक्षां ह्या सालांत शेकडा २५ नें व्यापार वाढला आहे. ह्यांत सरकारी सामान व खजीना धरिला तर एकंदर उलाढालीची रक्कम १,६९.८९,८६३ रुपये होईल. ह्या सालांत फक्त स्वतंत्र संस्थानांतून ४९,७१,१५,६०७ रुपये किमतीचा ह्मणजे मागील सालापेक्षां ३ कोटि रुपयांचा माल अधिक हिंदुस्थानांत आला. चीन देशाच्या बंदरांतून ४,०४,७१,११४ रुपयांचा व आस्ट्रेलिया, टासमानिया व न्युझीलंड मधून अडीच कोटि व स्ट्रेटसेटलमेंट मधून पावणें दोन कोटि [illegible] आला. युरोपांतील [illegible] इटाली [illegible] ६४ [illegible] स बेटांतून उत्तरोत्तर कमी कमी माल येतआहे आस्ट्रिया मधून येणारा माल वर्षानुवर्ष वाढत चालला आहे तो इतका कीं सन १८७९ सालापेक्षां ह्या साला तो दसपटीनें वाढला आहे. सर्व देशांपैकीं ग्रेटब्रिटन आणि आयर्लंडमध्यें हिंदुस्थानांतील माल अधीक गेला. चीन देशांत १३ कोटि; फ्रांसांत ८ कोटि; बेलजम, इटली, इजिप्त, स्वतंत्र संस्थानें व स्ट्रेट सेटलमेंटस ह्या प्रत्येकांत तीन तीन कोटि रुपयांचा माल गेला. शिवाय आस्ट्रियामध्यें व सिलोनमध्यें दोन दोन कोटि, इराणांत दीड कोटि आणि माल्टा मध्यें सुमारें एक कोटि रुपयांचा माल हिंदुस्थानांतून पाठविला गेला.

## चीन व फ्रान्स यांज-मधील लढाई

ह्या लढाई विषयीं कोलंबोच्या तारीख १० च्या तारेवरून कळतें कीं फ्रान्स देशाच्या राज्याच्या प्रधानानें चीनच्या बादशाहणीशीं तहाचें बोलणें लावलें आहे तें असें कीं चीनानें फ्रान्साला पूर्वीं मागितल्या प्रमाणें पैक्याची रक्कम न देतां फार्मोसा हें बेट पन्नास वर्षें पावेतों देऊन त्या [illegible] गाडीचा रस्ता करण्याचा व जकातीचा वसूल घेण्याचा हक्क द्यावा. चीनानें तें बेट वीस वर्षें पावेतों देण्याचें कबूल केलें होतें पण तें म्हणणें फ्रान्स देशच्या प्रधानानें नाकारिलें.

आडमिरल कूबर्ट ह्यानें केलुंग येथील कोळशाच्या खाणी घेतल्यावर त्यास दुसरें कांहीं एकठाणें मिळालें नाहीं. त्यास कुमकेची व सर्व प्रकारच्या अन्नसामग्रीची जरूरी आहे. त्याचे जवळ २००० सैन्य असून त्याच ठिकाणीं चिनई लोकांची १५००० फौज आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं फार्मोसा बेटांतलि बंदरें व शहरें स्वाधीन करून घेण्यास १०००० सैन्य असलें पाहिजे. चिनई लोकांच्या सैन्यास पहाडी लोकांच्या मोठ मोठाल्या टोळ्या येऊन मिळाल्या आहेत; ते लोक कवाइत शिकलेले नाहींत पण शूर आहेत. त्यांस फ्रेंच लोकांची बिलकुल भीति वाटत नाहीं. फार्मोसा बेटाच्या दक्षिणे कडील बंदरें चांगलीं बांधलेलीं असून तेथें मोठ मोठ्या इंग्लिश तोफा आहेत. परंतु चिनई लोकांजवळ अन्न सामग्रीची कमताई आहे व सैन्यास पगार देण्या साठीं त्यांजपाशीं पैशाचीही तूट आहे आणि धान्य दुर्मिळ होत चाललें आहे. शस्त्रें व सामग्री ह्यांनीं भरलेलीं दोन इंग्लिश आगबोटी धुकें पडलें असतां शत्रूचीं गलबतें धरणें वगैरे कामाकरितां समुद्रांत फिरणाऱ्या फ्रेंच गलबतांस चुकवून चीनच्या किनाऱ्यावर उतरल्या तेव्हां पासून केलुंग आणि तामसुई येथें मालांनीं भरलेलीं गलबतें येऊं देण्याची फ्रेंचांनीं मनाई केली आहे. पण ब्रिटिश आडमिरलचें आडमिरल कूबर्ट ह्यांस असें सांगणें आहे कीं उघड रीतीनें लढाई सुरू झाली नसतां अशी मनाई करण्यास व जहाजांवर शोध करण्यास त्यांस बिलकुल अधिकार नाहीं. फ्रेंच सैन्यांत दारु गोळ्याची फार तूट आली आहे व आक्टोबर महिन्याच्या ८ व्या तारखेस जो त्यांचा तामसुई येथें पराभव झाला तो दारुगोळा संपून गेल्यावर अधीक पुरवटा न झाल्या मुळेंच झाला. टांकींग मध्यें नवीन लढाई सुरु झाली आहे. युनानच्या सरहद्दीवरून चिनई लोकांनीं दक्षिणे कडेस जाऊन फ्रेंचांवर हल्ला केला तेव्हां मोठी लढाई झाली पण तिची कच्ची हकीकत अद्याप बाहेर पडली नाहीं पण दोन्ही पक्षांचा [illegible] पुष्कळ नाश झाला असें म्हणतात. फ्रेंच लोकांचे सैन्यांत फार आजार उद्भवला आहे व जखमी झालेले शिपाई लोकांच्या

खमा सडत जाण्याची ही भीति मोठी आहे. कंतान, फुच्चू आणि शांघाय येथील लोकांत शांतता आहे पण उत्तरेस शिपाई लोकांत दंगे सुरू आहेत. पेकीन व नांकिन ह्या शहरांसभोंवतीं फौजेचा मोठा जमाव आहे. फ्रेंचलोक उत्तरे कडील प्रांतावर कदाचित् हल्ला करितील म्हणून त्या भागाच्या संरक्षणा करितां मोठ मोठाल्या तयाऱ्या चालू आहेत. ह्या संरक्षणा करितां जमा केलेल्या सैन्याचे आधिपत्य व्हाइसरायली हे घेणार. त्यांस जय मिळविण्याची फार खात्री आहे. उत्तरेकडेस दव फार पडत चाललें आहे आणि लवकरच कडक थंडी पडणार चिन्हें दिसत आहेत. वेंचू येथें एक दंगा नुकताच झाला होता तो युरोपियन लोकांस नुकसानी बद्दल ३५००० डालर्स देऊन मिटला गेला. सर्व बंदरांतील व्यापार फार मंद झाला आहे.

अर्ल ग्रन्व्हानव्हिल्ली ह्यांच्या थोड्या दिवसां पूर्वी झालेल्या ग्यानहान हौस मधील भाषणावरून कळतें कीं आपले सरकारचा फ्रान्स व चीन ह्यां मध्यें मध्यस्थी करण्याचा इरादा खचित आहे. आतां ह्या दोन्ही देशांत परस्पर मध्यें तहाचें बोलणें अधीच चाललें आहे यावरून दिसतें कीं ह्या दोहों पैकीं कोणा एकाची तह करण्याच्या कामीं थोडीशी ढिलाई दिसली तरच हे मध्यस्थी करितील. इंग्लिश सरकार प्रसंग पडला असतां मित्रभावानें मध्यस्थी करण्यास तयार आहेत ह्या गोष्टी वरून असें दिसतें की आरंभिलेल्या तहाच्या बोलण्याचा घाट व्यर्थ जाणार नाहीं. असें दिसतें कीं फ्रेंच मिनिस्टर ह्याचे मनांत फार्मोसा बेट घेण्याचें पूर्वींच येऊन चुकलें होते. आडमिरल कूर्बट ह्यांनीं केलुंगवर हल्ला केला त्याचा परिणाम चिनई लोकांवर कांहीं एक झाला नाहीं तसेंच फूचू येथील फ्रेंचांच्या तोफखान्याचा नाश झाल्यावर त्यांनीं आपलें ठाणें तेथून काढून केलुंग येथें घातलें ह्या गोष्टीचाही पेकीन येथें विशेष ग्रह झाला नाहीं. ह्या वरून दिसतें कीं फ्रेंचांचेही मनांत लढाई करावी असेंच नसून मनुष्याच्या व पैशाच्या नुकसानी बद्दल कांहीं तरी प्राप्ति व्हावी असें होतें. हें तहाचें बोलणें प्रथमतः फ्रेंच सरकारानेंच लाविलें असेल असें जरी कांहीं गोष्टी वरून संभवत नाहीं तरी फ्रेंचास तिकडे आपला बचाव करण्यास चाळीस हजार फौजेची जरूरी आहे असें ज्या अर्थीं म्हटलें आहे त्या अर्थीं एवढें मोठें सैन्य जमा करून पेकीनवर चाल करण्याचें सोडून देऊन तेच प्रथम तहाचें बोलणें लावण्यास राजी झाले असावेत असें वाटतें. टांकिंग मध्यें फ्रेंच लोकांस जे जय मिळाले आहेत त्यांची बाहेर पडलेली हकीकत जर खरी असेल तर ज्या अर्थीं फ्रेंच लोकांचा नाश पुष्कळ झाला आहे त्या अर्थीं तह करण्या विषयींची त्यास जितकी अवश्यकता वाटत असेल तितकीच फ्रान्सास वाटत असली पाहिजे. म्हणून लढाईची जी आज स्थिति असेल ती वरून जरी कदाचित तह करणें योग्य वाटत नसेल तरीं उभय देशांच्या व्यापाराच्या आणि जमाखर्चाच्या स्थितीच्या संबंधानें पाहिलें असतां हें तहाचें बोलणें उभयतांच्या विचारानें सिद्धीस जाऊन लौकरी तह ठरावा हेंच एकंदरींत इष्ट आहे.

## इंडियन इन्स्टिटयूट.

ह्या विद्यालयाची स्थापना आक्सफोर्ड येथें थोडेच दिवसांपूर्वीं झाली याचें सर्व श्रेय प्रसिद्ध प्रोफेसर मोनियर उइल्यम्स यांजकडे आहे. हें विद्यालय स्थापन करण्यांत त्यांचा हेतु असा आहे कीं ह्या देशांतील धर्म, भाषा, रीती भाती वगैरे गोष्टींची अभिरुचि इंग्लिश लोकांस प्राप्त होऊन हिंदुस्थानांत राहून त्यावर राज्य करण्यास ते अधिक पात्र व्हावेत; हिंदुलोकांस आपल्या देशाची सेवा अधिक चांगल्या रीतीनें करितां यावी; आणि हिंदुस्थान संबंधी सर्व विषयांचा अभ्यास करणें सुलभ जावें. हिंदुस्थानच्या सांप्रतच्या स्थितीच्या मानानें अशा प्रकारची योजना विलायतेंत होणें वास्तविक जरूरीचें होतें म्हणून प्रोफेसर मोनियर उइल्यम्स यांनीं फार परिश्रम करून ह्या गोष्टीची अवश्यकता आपल्या देश बांधवाच्या मनावर ठसून देऊन ही गोष्ट आपण सिद्धीस नेली हें त्यास फार भूषणास्पद आहे. ह्या विद्यालया पासून हिंदुस्थानास काय काय फायदे होण्याजोगे आहेत हे त्यांनीं आपल्या भाषणांत चांगल्या रीतीनें व्यक्त करून दाखविलें आहे म्हणून त्याचाच सारांश आम्ही येथें देतों.

सन १८२१ सालापासून १८७९ पावेतों एकंदर ९०३ सनदी सिव्हिल सर्व्हंट नेमिले गेले त्या पैकीं निदान ११८ तरी युनिव्हर्सिटींत शिकलेले होते. ह्या वरून असें सिद्ध होतें कीं हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यां पैकीं बरेच गृहस्थ युनिव्हर्सिटींत शिकलेले आहेत. हिंदुस्थानांत इंग्लिश लोकांचें वास्तव्य केवळ वसाहत करणारा प्रमाणें नाहीं. त्यांचा ह्या देशाशीं धनीपणाचा संबंध आहे. पूर्वी रोमन लोकांची ब्रिटनदेशावर जशी सत्ता होती तशीच इंग्लिश लोकांची हिंदुस्थानावर आहे. परंतु त्या वेळेस ब्रिटन देशची लोक संख्या दहा लक्ष देखील नव्हती आणि हिंदुस्थानची लोकसंख्या तर आतां २५ कोटि ४० लक्ष झाली असून त्यामध्यें सर्व मुलकी व लष्करी कामदार मिळून सुमारें एक लक्ष चाळीस हजार इंग्लिश लोक आहेत व त्यापैकीं सरासरी ९,००० जण सनदी सिव्हिलसर्व्हंट आहेत आणि त्यांचेच हातां खालीं काय तो खरोखर राज्यकारभार आहे. हे गृहस्थ प्रथमतः जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां कित्येकांचें वय वीसाहून कमी असेल त्या वेळेस एकदम त्यांना न्यायाधीशाच्या अगर कलेक्टराच्या जागा मिळून ते पुढील दहा बारा सालांत वाढत वाढत जाऊन आतां पुष्कळांच्या अमला खालीं अनेक लक्ष लोक आहेत. असें ही घडून येण्याचा संभव आहे कीं जो गृहस्थ इंग्लंडांत साधारण प्रतीचाच राहिला असता ते हिंदुस्थानांत कदाचित् कमिशनर लेफ्टनेंट गव्हरनर, गव्हरनर व प्रसंगविशेषीं गव्हरनर जनरल ही होईल. ह्या करितां अशा जागे करितां वास्तविक विद्वान् लोकच विलायतेतून बाहेर पाठविले पाहिजेत हें किती महत्वाचें आहे? उत्तम शिक्षण युनिव्हार्सिटी शिवाय कोठून मिळणार? सिव्हिलसर्व्हिसच्या परीक्षेस हिंदुस्थानांतून येणाऱ्या गृहस्थांनीं युनिव्हर्सिटी मध्यें कांहीं दिवस राहिले पाहिजे असें जें सरकारानें ठरविलें आहे त्याचा हेतु हाच आहे. तरी त्यांचा अमुक एक परीक्षा उतरलीच पाहिजे अगर त्यांनीं अमुक एक डिग्री मिळविलीच पाहिजे असा निग्रह नाहीं. आतां ह्या परीक्षेच्या वयाची मुदत कमी झाली आहे म्हणून प्रोफेसरांनीं असें सुचविलें आहे कीं त्या परीक्षेंत आलेल्या उमेदवारानें युनिव्हार्सिटींत दोन वर्षांच्या ऐवजीं तीन वर्षें राहिलें पाहिजे. तसेंच डिग्री घेणें हें उमेदवाराचें खुषीवर न ठेवितां ती मिळविणें त्यास अवश्य असावें असें ही त्यांनीं सुचविलें आहे. अशी कदाचित् वेळ लवकरच येईल कीं सिव्हिलसर्व्हिस कामिशनरांस ती परीक्षा युनिव्हार्सिटीकडेच सोपाविशी वाटेल. आक्सफोर्ड युनिव्हार्सिटीमध्यें तर अधीच इंडियन सिव्हिलसर्व्हिसचा क्लास आहे. आतां हिंदुस्थानांतील भाषा शिकविण्याचा एक वर्ग निघाला म्हणजे झालें.

हिंदुस्थानांत कशाच्यानाकशाच्या निमित्तानें ज्यांला ज्याला जावयाचें असेल त्यांस मराठी भाषा येणें अगदीं जरूरीचें आहे; आणि इंडियन सिव्हिलसर्व्हिसच नव्हे तर वैद्य, वकील, पाद्री, लष्करी खात्यांतील लोक ह्या सर्वांस मराठी आली पाहिजे. जे मिशनरी लोक हिंदुस्थानांत जाऊन धर्मोपदेश करीत फिरतात त्यांस हिंदु लोकांच्या वादविवादाचें खंडन करितां येण्यास मराठी येत असून हिंदुधर्म शास्त्राची मूलतत्वें जरूर माहित असलीं पाहिजेत. तसेंच पार्लमेंट सभेच्या नायानें हिंदुस्थानाचें बरें वाईट करणें ज्यांचे हातीं असतें त्यांस ही हिंदुस्थानसंबंधीं चांगली माहिती झाली पाहिजे. ह्या इंडियन इन्स्टिटयूटमध्यें सर्व प्रकारचें शिक्षण व सर्व प्रकारची माहिती दिली जाईल. हिंदुस्थानांतून विलायतेंत जाऊन शिकणाऱ्या नेटिवांस स्कालरशिपा मंजूर झाल्या आहेत त्या अमुक एक शाळेस जरी जोडल्या नाहींत तरी ह्या इंडियन इन्स्टिटयूटकडेच अधिक उमेदवार जाऊं लागले म्हणजे त्या सर्व त्याच विद्यालयास कदाचित् जोडल्या जातील आम्ही असें इच्छितों कीं प्रोफेसर मोनियर उइल्यम्स ह्यांच्या त्या अल्पारंभास श्रेय येऊन ह्या इन्स्टिटयूटसंबंधीं त्यांचा हेतु पूर्णपणें सिद्धीस जावो.

## लार्ड रिपन यांस मानपत्र.

काल सायंकाळीं साडेपांच वाजतां येथील इंग्लिश मराठी शाळेंत नामदार लार्ड रिपन साहेब यांस मानपत्र देण्या करितां मोठी सभा भरली होती. लोकांची गर्दी पुष्कळ जमली होती. अध्यक्षस्थानीं रा.रा. अवाजी खंडेराव वकील यांची स्थापना झाल्या नंतर त्यांनीं थोडक्यांत सभेचा उद्देश प्रदर्शित केला. पुढें रा. रा. देवराव विनायक वकील यांनीं वऱ्हाडांतील सर्व लोकांनीं मिळून व्हाइसराय साहेबांस मानपत्र पाठविण्या विषयीं सूचना केली. लार्ड रिपन साहेबांचे गुणानुवाद वर्णन करून त्यांनीं आल्या पासून केलेली मुख्य कृत्यें यांचें थोडक्यांत विवेचन केलें. एकंदर देवराव साहेब यांचें बोलणें जरा लांब खरेंच पण चांगलें झालें. त्यांच्या सूचनेस रा. रा. महाजनी यांनीं अनुमोदन दिलें. महाजनी यांनीं लाट साहेबांचे स्नेहभावा विषयीं थोडक्यांत पण चटकदार भाषण केलें. नंतर रा. रा. व्यकंटराव मुधोळकर यांनीं मानपत्राचा मसुदा वाचून तसें मानपत्र इंग्रजींत धाडण्या विषयीं सूचना केली. त्यास खा. सलीमखान यांनीं अनुमोदन दिलें. मग रा. रा. रामभाऊ पन्हाळकर यांचे सूचने वरून एक सब कमिटी नेमण्यांत आली. या सूचनेस मौलवी अबदूल कादर यांनीं अनुमोदन दिलें. सर्व सूचना लोकांस पसंत पडल्या. या नंतर जमलेल्या मंडळींनीं सह्या केल्या. या सभेनें जें मानपत्र तयार केलें आहे तेंच मानपत्र उमरावती येथील सभेस मान्य आहे अशीं पत्रें व निरोप आल्यावद्दल रा. रा. देवराव बाबा यांनीं बोलून दाखविलें. मानपत्रावर सहा हजारावर आज तिसीं सह्या झाल्या आहेत. अध्यक्ष यांचे आभार मानून शेवटीं सभा विसर्जित झाली.

The Berar Samaarch

MONDAY, December, 1, 1884.

## THE LOCAL MUNICIPAL CASES

We understand that the Resident is coming into Berars in or about the time of the Christmas holidays. We were very doubtful about the matter as the disturbances at Hyderabad had added to the multiplicity of Mr. Cordery's work. But recent advices state that he has not yet given up the idea of coming into Berars; on the contrary he is trying his best to find time. If the visit does become a *fait accompli* we earnestly request the head of the Berar administration to pay a visit to Akola, if for nothing else, for forming a practical judgment on the municipal cases which are pending in the High Court under its extraordinary jurisdiction. If the second hearing of the applications be fixed at Akola matters wil become very easy of solution to such a shrewd judge as Mr. Cordery.

It is said that Mr. Cordery while he was a *Deputy* Commissioner at Akola rarely decided any cases off-hand in which a personal inspection of the spot was likely to throw more light on the subject matter in dispute in questions relating to immovable property. We would appeal to the learned judge to apply the same test to the present cases. As the application is *sub judice* we express no opinion one way or other, but we can say this without fear, that a personal inspection of the Verandas which the Municipality claim to be a public place and which the shop-keepers assert are their own private premises, will convince the judge as to the intrinsic worth of the claim adduced by each party. The decision in this case will set at rest a long standing question. If the Municipality wins, the Bazar will not prosper as the shop keepers will not be able to hire the premises as they will have to labour under great disadvantages. If the shop-keepers succeed the decision will give a fresh stimulus to the prosperity of the Bazar. The places which have been deserted on ac-

count of serious inconvenience will be rented again espacially as the tenants will be secure against the exactions of the municipality. By the bye we would request the local municipality to take into consideration the desirablity of renting the open space in front of a row of shops close to the Bazar which have long been deserted for want of accomodation. It is one of the principal duties of the municipality to give encouragement to traffic, to see the *Bazar* prosper all at one place as it conveniences both the public and the shop-keepers. Why then put unnecessary obstruction to its growth. The open ground we refer to will be a paying concern to the municipality while one part of the Bazar side will [illegible] more show the ghastly appearance it now presents. We know as a matter of certainty that in Poona there is a Peth called *Daneali*, not only the Farshi in front of the shops is there offered to the shopkeepers on rent, but also a part of the main road is offered The tenants accept it under an obligation to use it with as little obstruction to the public as they could possibly do. What purpose does the Municipality serve by keeping the ground open as it now does. The road is wide enough, and no harm can arise by letting the open ground on some suitable terms. It would be poor theory that proves nothing. We once more request the municipality to open its eyes and take the matter into its earnest and thoughtful consideration.

## MR. TAINE ON SOCIALISM.

In the course of an article in the October No. of the Contemporary Review Mr Taine has given a lucid picture of the present state of individual and political action and their bearings on each other. At the outset we must express our obligations to him for explaining, for representing the present state of thought and action, representing man independent of and man dependent on society or Government which is only another word for it. He has vigorously defended the flow which the stream of national English thought is now taking before which the expression of the Jacobin theory appears in all its nakedness— a dwarf- a nice picture side by side with a monstrosity, an unnatural production in fine. The expression of the views on the present state of thinking, the clear and impressive language in which they are clothed, the vigour and strength of opinions which gather round them all tend to make his theory impressive without tediousness and pleasing without labour. You come to the end of the essay before you have known that it is finished If anything, you feel, is too short. We would recommend the article to every thinking man not for a learned display of knowledge or vastness of information but for the correct representation of the position he occupies in society and which society itself occupies. When the ancient state of man and the objects aimed at by Governments of old times are read in one breath with the objects which the present civilized Governments have laid before them, it appears that the change from the one to the other though very distinct is not yet too sudden It is an evolution from the former mass of materials. We make an extract below of the character of Jacobins from the pages of this sensible essay:—

"They are not military chieftains, like Cromwell and Napoleon—generals of an army, obeyed without a murmur—but plain speech-makers, at the mercy of an audience that sits in judgment on them. There is no discipline in this audience: every Jacobin by his principles remians independent; if he accepts leaders, it is with a regard to their worth to him; selecting them as he pleases, he is free to change them when he pleases; his trust in them is intermittent, his loyalty provisional, and, as his adhesion depends on a mere preference, he always reserves the right to discard the favourite of to-day as he has discarded the favourite of yesterday. In this audience there is no such thing as subordination; the lowest demagogue, any subaltern brawler, a Hebert or Jacques Roux, who is ambitious to step out of the ranks, outvies the charlatans in office in order to obtain their places. Even with a complete and lasting ascendancy over an organized band of docile supporters, the Jacobin leaders would be feeble for lack of reliable and competent instruments; for they have but very few partisans other than those of doubtful probity and of notorious incapacity. Cromwell had around him, to carry out the Puritan programme, the moral *elité* of the nation, an army of rigorists with narrow consciences, but much more strict towards themselves than towards others, men who never drank and who never swore, who never indulged for a moment in sensuality or idleness, who forbade themselves every act of omission or commission about which they held any scruples, the most honest, the most temperate, the most laborious, and the most persevering of mankind, the only ones capable of laying the foundations of that practical morality on which England and the United States still subsist at the present day."

In the Residency Orders just issued is printed in *extenso* the Resolution of the Government of India on the inquiry conducted and report [illegible] by the Education Commission. We intend to note the principal points dwelt with in the *Report*, and to give a definite shape to our observations we have given below the Government of India's resume of the general views as contained in para 6:—

"It appears from the Report that the experience of nearly thirty years has brought to light no serious flaw in the general outlines of the policy laid down in 1850 and confirmed in 1859. If in any province unsatisfactory results are brought to notice, or if the progress made in any particular respect [illegible] to have been less than might have been hoped for, this will almost invariably be found to have been due to a departure from, or failure to act up to, the principle of the despaches upon which the whole educational system rests. The Commission have done good service in indicating clearly where mistakes of this kind have been made, and their recommendations are so framed and descend at times to such minuteness of detail, that, when once the orders of Government have been issued in respect of them, no departures from the right paths should be possible in the future. It is especially matter for congratulation that so much substantial unanimity has been secured among a body of men representing so many different interests and such varied lines of training and experience."

Nawab Koorshed Jah and Munirulmulk, with Belgrami, leave Hyderabad for Calcutta on the 3rd December.

Out of five candidates who appeared in the 2nd B Sc. Examinasion, the following were on the last Monday declared to have passed.

Class 11.— *D*amubhai Dayabhai Mehta.

Pass — *B*apuji Pallonji *D*octor, Harilal Malshanker Pandit, and Kamrao Krishna Parvati. *B. G.*

A correspondent writes to the Bombay gazette from Hyderabad in reference to the recent riots:— "It is annouced that the *C*ommission, which has hitherto been taking evidence, has finished that part of its labours. A printed copy of the proceedings, including the evidence taken, has been supplied to each of the members who is supposed to record his opinion, or the conclusion he arrives at after due consideration. These several opinions and conclusions, are to be considered on Monday next, when the Commission, it is supposed, will prepare its final report. The witnesses proudced before the Commission were all. or nearly all, witnesses brought by Kotwal, and were examined by a man who, although now in the service of one of the nobles here, long practised as a pleader; and as no professional man was allowed to appear for Sultán Nawaz Jung to cross examine the witnesses produced, and to elicit further facts or test their veracity, the value of the evidence adduced is not likely to have much weight with any impartial person"

## वऱ्हाड

मे. डायरेक्टर साहेबांची स्वारी तेलंगांवा कडे आहे. पुढें वणी जिल्ह्यांत जाणार असें कळतें

मेहरबान जूडिशिल कमिशनर साहेब यांची स्वारी आज येथें येणार असल्याचें कळते.

मि. नागलीयार्डी या साहेबांनीं एक पुतळा त्रावणकोरचे महाराजा करिता तयार करून त्रिवेंड्रम येथें पाठविला आहे. हा पुतळा महाराज संस्थानांतील एका सामाजिक मंडळीस देऊन तो खुला करण्याचा समारंभ स्वत: करणार आहेत.

जोधपूरचे व विजयानगरमचे महाराज कलकत्यास येऊन दाखल झाले. सर.स्टू. बेली, सर. आ. कालव्हीन व आ. मि. इलीटन व्हाइसरायचे कायदे काउन्सीलचे सभासद हे सिमल्याहून २४तारखेस कलकत्यास आले.

निजाम सरकारचा आवरंगाबादेस नाण्याचा बेत तूर्त रहित झाला आहे.

सीगनार गॉगलियार्डी हे गेले बुधवारीं निजाम साहेबांच राजधानींत [illegible] बाबर कै. सर सालरजंग यांचा पुतळा त[illegible] यार करून रेसिडेंट साहेबांचे [illegible] ण्या करितां [illegible]ला आहे. याचा [illegible] समारंभ लौकरच होईल. हा स्मारक पुतळा या नावानें ओळखला जाईल. असेंच पुतळे निजाम साहेब व सध्याचे प्रधान सालरजंग याजकरितां तयार होत आहेत. पुतळे करारा दगडाचे असून निर्मल आहेत व ते काळे संगमरवरी दगडाचे चौथऱ्यावर सोनेरी नक्षी करून बसविले जातील त्यांची एकंदर उंची ७ फूट होईल.

नवाब खुरशीदजा मुनीरउलमुल्क व बेलग्रामी साहेब हे तारीख३ दिसेंबर रोजीं हैद्राबादेहून कलकत्यास जाण्याकारितां निघणार आहेत.

जाहिरात

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

आज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहीवाटीस सर्टीफिकिट मिळण्याविषयीं अथवा आज्ञानाच्या पालन व त्याच्या माल मिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयी सन १८५८ चा आक्ट ४० कलम ६ प्र.

आर्जीचा नंबर. कि.क्लास नंबर११ मिसल नंबर ४ १८८४

दिपुटीकमीशनर साहेब जिल्हा. अकोले यांचे कोर्टात

अर्जदार सेक इमाम

बापाचें नांव. गुलाम यासीन

जात मुसलमान

राहणार पातूर सेखबाबू साहेब ता. बाळापूर

वरील आज्ञान) अबदुलगफूर बापाचें नांव अबदुलरसुल जात मुसलमान राहणार पातुर सेखबाबु ता। बाळापूर जिल्हा अकोले याणें (याच्या माल मिळकतीच्या वहीवाटीचें सरटीपिकीट मिळावें म्हणून) (याचे पालन व माल मिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा म्हणून) आर्ज दिला आहे यास्तव मृत्यु पत्राचे आधारें किंवा दस्त ऐवजावरून किंवां अगदी जवळचे नातलग पणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहु आज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ करताना यानें कब्ज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्यासर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहेकीं, आणी तारीख१९ माहे दिसेंबर सन १८८४इ।। रोजी वरील आर्जीची चौकसी होणार आहे तेवेळी ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हकीकती दाखल करावी तारीख १० माहे नवंबर सन १८८४इ।।.

सीका

टीप कौसांतील दोन वाक्यातून एक गाळून टाकावें.

J. Fitz-gerald
Dy. Commissioner
[illegible]
Akola District.

## वर्तमानसार

ब्रह्मदेशचा राजा थीबा यास त्याच्या फ्रेंच मसलतदारांनीं असें सांगितलें कीं, इंग्रजांचें लक्ष इजिप्त व आफ्रिकेकडे इतकें लागलें आहे कीं, त्यांना आपल्या मुलखांत हात घालण्यास वेळच नाहीं. तेव्हां थीबा म्हणाला, आपण गादीवर बसल्या दिवसापासून आपल्या मनांत आहे कीं, एक वेळ इंग्रजांच्या सामर्थ्याची परीक्षा पाहावी. असें रंगून गाझेट पत्राचा मांडले येथील बातमीदार तारेनें कळवितो.

उत्तर आफ्रिकेवरून जाणारी इंडो-युरोपियन आगगाडीची सडक बांधण्याकरितां एक नवी कंपनी उभी होत आहे. ही सडक पारीस, जिब्राल्टर, ताजिअर्स, टायुनिस, त्रिपोली, केरो, बसरा, कराची, व मुंबई या शहरांमधून जाईल. या कंपनीचें भांडवल एक कोटी वीस लक्ष पौंड असेल.

म्युनिच शहरांतील स्वीनिंजर नामक वैद्यानें मानवदेहाची स्थूलता कमी करण्याची एक नवी रीति शोधून काढिली आहे. ती ही कीं, एकाच वेळेस खायाचें व प्यायाचें नाहीं, व खाण्यापासून निदान दोन तास तरी पिण्यांत अवकाश जाऊं द्यायाचा. या उपचारानें प्रिन्स बिस्मार्क यांच्या शरीराची स्थुलता वाढत होती ती बंद झाली असें सांगतात!

अमेरिकेमध्यें पेन्सिल्वोनिआ प्रांतांतील एका आगगाडीच्या कारखान्यांत एका तासांत ऐशीं मैल चालेल असें एक एंजीन तयार केलें आहे. ही वेगाची पराकाष्टाच झाली.

अमेरिकेंतील कानडा प्रांतांत विद्युल्लतेच्या योगानें स्वयंपाक करण्याचें यंत्र नवीन निघालें आहे. सु० प०

अहमदाबादे नजीक कोळसे आणि लोखंड ह्यांच्या खाणी लागतील असें खात्रीपूर्वक वाटल्यावरून तेथील एका श्रीमंत गृहस्थानें एक मंडळीची स्थापना करून खाणींचा कारखाना सुरू करण्याचा विचार चालविला आहे.

गेल्या अठरा महिन्यांत पारिस शहरीं व त्याच्या आसपास सुमारें ७६ देवळें फोडून चोरांनीं दरोडे घातले. ही धर्मपरता ख्रिस्ती नव्हत अशा देशांत क्वचित आढळते.

डांग्या खोकल्यावर टरपेन्टाइक दिलें असतां तो बरा होतो असें एका डाक्टरानें आलीकडे प्रयोग केला त्यावरून दिसून येतें.

पाटनापासून बांकीपूरपर्यंत ट्रामवेची गाडी चालू करण्याचा एका ट्राम कंपनीचा विचार आहे.

गेल्या वर्षी जो एज्युकेशन रिपोर्ट छापला त्याचें परिशिष्ट म्हणून सरकारानें ३,०२४ पानांचे आठ भाग प्रसिद्ध केले आहेत. त्यांत प्राव्हिन्शल रिपोर्ट आहेत असें ट्रिब्यूनवरून कळतें. ज्ञा० प्र०

सिलोन मध्यें एक मुलगा फारच मोठा पतंग उडवीत होता' तो इतक्या जोरानें उडाली कीं- मुलगा समुद्रांत जाऊन बुडाला.

रक्तेंदू - गेल्या चौथ्या तारखेस रोम (इटाली) एथें रात्रीं ९॥ वाजतां मि. टाकूचिनी नांवाच्या गृहस्थानें चंद्रबिंब शुद्ध लाल झालेलें पाहिलें; त्याच्या आसपासचा भाग देखील ताम्र वर्णच दिसला. असा रंग सुमारे अर्धा कलाक पर्यंत दिसला! पुन्हा दुसरे दिवशीं रात्रीं ही असाच रक्तवर्ण इंदु दिसला. धा० वृ०

लार्ड चर्चीलहे हिंदुस्थानांत येण्याकरितां येत्या महिन्यांत विलायतेंहून निघणार आहेत. हे लोक इकडे येऊन करणार काय?

तांबड्या समुद्रांतील ओबकच्या शेजारचा बे आफ तडजुरा फ्रेंचानें खालसा करून आपल्या ताब्यांत घेतला.

इंग्लंडानें आपल्या एका लढाऊ गलबतास चीनास जाण्याचा हुकूम केला आहे.

दक्षिणभाग कमिशनर मि. क्राफर्ड हे सिंध प्रांताचे कमिशनर होणार असें म्हणतात!!

अमृतसर येथील सुवर्ण मंदिरास जुन्या गव्हरनर जनरलांच्या रीतीस अनुसरून लार्ड रीपन यांनींही ५०० रुपये दिले!

अलिगढ येथें जें मुसलमानी कालेज आहे त्याचा पाया लार्ड लीटनच्या हातून बसविलेला असून आज त्यांत २७० विद्यार्थी आहेत व इमारतीकरतां वगैरे आजपर्यंत वर्गणीनें १,८२,००० रुपये खर्च झाले आहेत.

विलायतेंहून दोन तोफखाने केप येथें रवाना झाले आहेत.

कराची व हैदराबाद येथील लोकांनीं मोठाल्या सभा करून लार्ड रिपन यांस मानपत्रें ही देण्याचें ठरविलें.

कर्नाटकांतील पकडलेला चोरटा कटी चन्पा एकदत वेळीं झालेल्या जखमेच्या आजारानें निझाम पोलिसाच्या ताब्यांत मरण पावला असें सांगतात.

सुलतान सरदारविरुद्ध बसलेल्या निझाम हैदराबादच्या कमिशनाचा ठराव उद्या बाहेर येणार असून मजवर आणलेले हे सर्व आरोप खोटे व पोलिसानें बनावट केलेले आहेत असा सुलतानानें निझामसरकारास अर्ज केला आहे.

बंगाल्यांतील कित्येक भागांत भाताचीं शेतें बुडालीं तरी दुष्काळ पडण्याची फारशीं भीती नाहीं असें सरकार सांगतें.

पार्लमेन्टचे मयत मेम्बर मि. फासेट यांच्या पत्नीस ईस्टइंडिया असोसिएशनच्या मुंबईच्या शाखेनें दुःखप्रदर्शक पत्रें पाठविलीं. या पत्राचीही बरीच गर्दी होत आहे.

लार्ड रीपनच्या स्मारकाकरतां सोलापुरास ६००० रुपये वर्गणी जमली.

कलकत्ता हायकोर्टांत आणखीं तीन जज्य नेमण्यांत येणार आहेत!

म्हैसूर रेलवे दक्षिण महाराष्ट्ररेलवेकंपनीच्या स्वाधीन करण्याबद्दल बोलणें सुरू आहे व तसें झाल्यावर म्हैसूररेलवे पुढें वाढविण्याचें काम दक्षिणमहाराष्ट्रकंपनीच करणार.

मयत मि. फासेटच्या पोस्टमास्तरच्या जागीं मि. शालिफर यांची नेमणूक झाली.

कलकत्त्यांतील जूट ठेवण्याच्या वखारीस आग लागून दीड लाखाचें नुकसान झालें.

चीन्यांस फार्मोसा येथून हाकून लावण्याकरतां फ्रेंच बरीच मोठी फौज तिकडे रवाना करीत आहे.

मि. सोराबजी माणकजी कांगा जेकर्सन भाईशंकरचे आर्टिकलक्लार्क हे मुंबईच्या गेल्या सालिसिटरच्या परीक्षेंत पास झाले. ज्ञा० द०

हिंदुस्थानाकडे येण्यास निघण्याचे पूर्वी लार्ड व लेडी डफरिन हे महाराणी सरकारचे पाहूणे होते.

मि. मार्केंझी वालेस यांणीं व्हाइसराय यांचे खासगी सेक्रेटरीची जागा पतकरली. हे गृहस्थ मुसलमानी राज्यांतील प्रजेवर एक ग्रंथ लिहित आहेत त्यास आरंभ करून सहा वर्षे झालीं; सरकारी काम आहे तोंपर्यंत त्यांना हें काम तहकूब ठेवावें लागेल.

नवी तोफ—म्याक्सिम नांवाच्या एका साहेबानें अशी एक यंत्राची तोफ काढिली आहे कीं, यंत्रास किल्ली दिली ह्मणजे एका मिनिटांत ६०० बार निघतात. बत्ती देण्याचें कारण नाहीं; तोफेच्यावर पाण्याचें पिंप ठेवण्याची युक्ति केली आहे त्या योगानें ती तोफ बार निघून गेल्यावर पाण्यानें तेव्हांच थंड होते असें वार्ताहर पत्रावरून समजतें.

काळीचे साऱ्याचे दोन हप्ते आहेत त्यां ऐवजी चार केले असतां कसें होईल ह्मणून सरकारांत हल्लीं वाटाघाटा सुरू असल्याचें कळतें.

पंढरपूर येथील गेल्या कार्तिकचे यात्रेचे कराचें उत्पन्न १५,०००रु. झालें.

आळंदीची यात्रा—या यात्रेस सुमारें ४० हजार लोक जमले होते. म्युनिसिपाल कमेटीस कराचें उत्पन्न ४,०००रु. झालें.

नैलच्या स्वारीचा खर्च भागविण्यासाठीं पुढील अर्ध वर्षपर्यंत धंदे पट्टींत दोन पेन्स वाढविणार असें मि. चाइल्डस् यांनीं जाहीर केलें आहे. ने० ओ०

हैदराबाद इलाख्यांतील नेटिव लोकांनीं स्वतःच्या भांडवलानें गुलबुर्गा स्टेशनापासून गुलबुर्गा शहरापर्यंत तीन मैल रेलवे करण्याचा बेत केला असून रस्त्याची मोजणी वगैरे ही झाली आतां येत्या डिसेंबर महिन्याच्या १४व्या तारखेपासून कामास आरंभ होणार असून सुरवातीचे समारंभा करितां खुद्द निजाम सरकार त्या दिवशीं गुलबुर्ग्यास येणार आहेत असें कळतें तीन मैलांत दोन स्टेशनें होणार आहेत असें म्हणतात. क०

अमेरिकेंतील—५२ तरुण स्त्रियांची एक मंडळी देशोदेश चमत्कार पाहण्यास निघाली आहे. हल्लीं ही मंडळीं जर्मनी देशांत आहे.

पेन्सिलव्हेनिया येथें आगगाडीचें एक एंजिन नुकतेंच तयार झालें आहे. ह्या योगानें आगगाडीचा वेग प्रती तासास ८० मैल जातो भगीरथ प्रयत्नी अमेरिकन खरे!!

स्त्री अगर पुरुष यांचीं लक्षणें तिनें अगर त्यानें वापरलेला जोडा पाहून सांगण्याची एक युक्ति जर्मनींत निघाली आहे. न्या० सु०

इंदूरच्या सावकारांची राजनिष्टा—इंदूरच्या सावकाराकडून नुक्ताच एक अर्ज लार्ड रिपन साहेबांकडे गेला असून त्यांत त्या सावकारांनीं महाराज तुकोजीराव होळकर यांचे निष्पक्षपाती राज्यकारकार्दीविषयीं फार स्तुतिपर मजकूर कळविला आहे. हे सावकार लोक ह्मणतात कीं, तक्तनशीद झाल्यापासून त्यांचा निष्पक्षपात व परोपकार बुद्धि हीं वारंवार दृष्टोत्पतीस आलीं आहेत. हा मजकूर ऐकून आह्मासही इंदूर सरकारच्या संबंधानें अभिमान पुरस्कर आनंद वाटतो. ज्ञा० च०

परदेश—पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील ज्या राजानें कामरून नदीचा प्रदेश जर्मन सरकारच्या स्वाधीन केला त्याला तेथील लोकांनीं बांधून मार खूप दिला. ज्ञा.


## विक्रीस तयार.

## भाग १० दहा.

## उपयुक्त चमत्कार संग्रह किंवा अप्रसिद्ध युक्ति औषधी, जादुटोना वगैरे.

प्रसिद्ध करणार भाऊ गोविंद सापकर.

भाग पहिला व भाग दुसरा.

ह्यांत गैबीएल्म, अप्रसिद्ध व उपयुक्त अशा नाना प्रकारच्या चमत्कारिक युक्ति, औषधी, जादु टोना वगैरे यांचा संग्रह थोडक्यांत ज्ञान होण्यासारखा विवेचन केला आहे.

भाग तिसरा रंगित व साधें दारूकाम.

ह्यांत फुलबाज्या, चिचुंद्र्या, नळे, चंद्रजोती, बाण इत्यादि अनेक प्रकारचें साधें व रंगित दारू काम तयार करण्याविषयीं खुलासेवार माहिती दिली आहे व अल्प आयासानें तयारही करितां येईल.

भाग चवथा, पांचवा आणि साहावा.

आतार, रंगारी, माळी वगैरे.

ह्या भागांत, प्रथम व दुसऱ्या भागांत सांगितल्या प्रकारची माहिती, व आतार, माळी वगैरे लोकांच्या कसबाची बरीच माहिती आहे.

भाग सातवा.

ह्यांत गंजिफा, तिफशी सोंगट्या, बुद्बळें, व पत्ते ह्या खेळाची माहिती साधारणपणें बरीच दिली आहे व खेळाचे प्रकारांचीं चित्रेंही पुस्तकारंभीं काढलेलीं आहेत.

भाग आठवा.

ह्या भागांत कपड्यांस नानातऱ्हेचे रंग करणे रंग रंगानी शाई करणे, कित्येक रोगांवरील औषधें, अश्वनय परीक्षाकरणें वगैरे अनेक उपयुक्त विषयांची परिस्फुटता केली आहे.

भाग नववा व दहावा.

ह्या भागांत गैबीएल्म, अप्रसिद्ध व उपयुक्त अशा नाना प्रकारच्या चमत्कारिक कृति वगैरे यांचा संग्रह केला आहे.

प्रत्येक भागास ५ आणे किंमत पडेल.

पुस्तकें ज्ञानचक्षु छापखान्यांत मिळतील.

बाहेर गांवचे घेणारांस टपाल हशिलाबद्दल दर भागास एक आणा जास्त पडेल.

एकदम १० भाग घेणारांस ट० हं० प० नाहीं.


हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेरा व बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XVIII AKOLA. MONDAY DECEMBER 8 1884 NO 47

वर्ष १८ अकोला सोमवार तारीख ८ माहे डिसेंबर सन १८८४ इ० अंक ४७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

६०

the Departme… …blamed for the

| | |
|---|---|
| वर्षाची आगाऊ | ५ |
| सहामाही ,, | ३ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांक हांशील. | |
| वर्षाचें आगाऊ | ०१३ |
| सहामाही | ०८ |
| साल अखेर | १०८ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी पावी म्हणजे पत्र सुरूं केलें जाईल.

## नोटिसींबद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०३ |

जाहिरात

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

आज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहीवाटीस सर्टीफिकिट मिळण्याविषयीं अथवा आज्ञानाच्या पालन व त्याच्या माल मिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयी सन १८५८ चा आक्ट ४० कलम ६ प्र.

आर्जीचा नंबर. कि. क्लास नंबर १३ मिसल नंबर ६।१८८४

दिपुटीकमीशनर साहेब जिल्हा. अकोले यांचे कोर्टात

अर्जदार ब्याहारीलाल

बापाचें नांव. माणक चंद

जात हलवाई

राहणार खामगांव

आज्ञान) सुंद्राबाई नवऱ्याचे नांव त्रिंबकहेमराज जात हलवाई राहणार खामगांव ता० मजकूर जिल्हा अकोले यांणें (त्याच्या माल मिळकतीच्या वहीवाटीचें सरटीफिकिट मिळावें म्हणून) (त्याचे पालन व माल मिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा म्हणून) आर्ज दिला आहे यास्तव मृत्यु पत्राचे आधारें किंवा दस्त ऐवजावरून किंवा अगदी जवळचे नातलग पणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहु आज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ करताना त्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्यास्वास या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं, त्याणी तारीख ३ माहे ज्यानेवारी सन १८८४ इ॥ रोजी वरील आर्जाची चौकशी होणार आहे तेवेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हकीकती दाखल करावी तारीख २८ माहे नवंबर सन १८८४ इ॥.

सीका

lone brought about by Gov…

टीप कासंतील दान वाक्यांतून एक गाळून टाकावें.

J. Fitz gerald

Dy. Commissioner

डपडुज्य

Akola District.

वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष वद्य ६ शके १८०६

## वऱ्हाडांतील व्यापाराचा रिपोर्ट.

( सन १८८३–८४ )

गेले सालापेक्षां ह्या सालांत व्यापाराची फार मंदी होती. ह्याचें कारण एकतर ह्या सालांत पीक फार कमीं झालें. व वऱ्हाड प्रांत केवळ शेतकी वर अवलंबून असल्या मुळें त्यांतील व्यापाराचे जिन्नस काय तें धान्य हेंच होय; व त्यांतही कापूस, गहूं आणि जवस हीं मुख्य होत. ज्वारीचाही पेरा सदरहु धान्या प्रमाणेंच पुष्कळ होतो पण तिचा खप प्रांतांतल्या प्रांतांतच फारसा असल्यामुळें ती फारशी बाहेर गांवीं पाठविली जात नाहीं. दुसरे, ह्या प्रांताच्या व्यापाराचा भर मुख्यत्वें करून मुंबईशीं फार आहे म्हणून तेथील व परदेशांतील कमी ज्यास्ती खपावर इकडील व्यापाराची मंदी अथवा तेजी अवलंबून आहे. गतवर्षीं अति वृष्टि झाल्यामुळें खरीपाचें पीक इतकें बुडालें कीं रुपयापैकीं सरासरी आठ दहा आणे पीक हातीं आलें. हा तोटा विशेष वाटण्याचें कारण असे कीं सर्व प्रांतांत एकंदर शेतकीच्या पाऊणपट लागवड त्याचीच होते ह्या सालांत प्रांतांतील एकंदर शेतकीच्या लागवडीचें क्षेत्रफळ ही कमीच होतें. खरीप म्हणजे मुख्यत्वें करून कापून व ज्वारी ह्यांची लागवड १,९२,०९५ एकर कमी झाली व अति वृष्टीमुळें रब्बीचें पिकास मात्र फायदा झाला आणि रब्बीची लागवड १,६१,९,७९ एकर अधीक झाली. वऱ्हाडांत कारखाने म्हणण्या सारखे नाहींत. वऱ्हाडनेऱ्यास मागलि सालापसून एक सुताची गिरणी झाली आहे त्या शिवाय कपाशीचे गठ्ठे बांधण्याचे १६ कारखाने असून एक तेल काढण्याचा आहे. ह्यां खेरीज पुष्कळ ठिकाणीं हात मागावर कांहीं कांहीं वस्तु होतात पण त्या दूर देशीं पाठविण्या इतक्या तयार होत नसल्यामुळें ह्या प्रांतांतील व्यापारांत त्यांची गणना होत नाहीं.

रेलवेच्या योगानें बाहेरून आलेला माल शेकडा ४.५ मणाने वाढला पण किमतीच्या मानानें शेकडा १२.४ रुपयांनीं माल कमी आला. गाडी रस्त्यानें येणाऱ्या व जाणाऱ्या मालाची गणती ठेवण्या करितां फक्त निजाम सरकारच्या सरहद्दीवर बुलठाणा, वाशीम व वणी ह्या तीन जिल्ह्यांचीं मिळून ८ नाकीं आहेत त्यांवरून निजाम सरकारच्या राज्यांतून वऱ्हाडांत येणाऱ्या अथवा वऱ्हाडांतून तिकडे जाणाऱ्या मालाचा मात्र हिशेब ह्या रिपोर्टांत धरिला आहे. ह्या रस्त्यानें शेकडा ७८.२ मण माल ह्या सालांत वऱ्हाडांत कमी आला व किमतीचे मानानें ही शेकडा ५५.४ रुपयांचा माल कमी आला. सन १८८२–८३ सालीं एकंदर २,७१,५९,४४१ रुपयांचा ३१,०२,४५४ मण माल वऱ्हाडांत आला असून ह्या सालांत (१८८३-८४) २,१७,८७,०९८ रुपयांचा २०,०७,९४१ मण माल आला. ह्या एकंदरीच्या मानानें पाहिले असतां शेकडा ३५.२ मण माल कमी आला असून किमतीच्या मानानेंही शेकडा १९.७ रुपयांचा कमी आला. बाहेर पाठविलेल्या मालाचें ही प्रमाण गुदस्त सालापेक्षां कमींच झालें आहे. रेलवेच्या योगानें बाहेर गावीं पाठविलेला माल ही शेकडा ३१.५ मणानें कमी होऊन त्याचे किमतीचेंही प्रमाण शेकडा २५.८ रुपयांनीं कमी झालें आहे. तसेंच गाडी रस्त्यानें बाहेर पाठविलेल्या मालाचेही प्रमाण शेकडा ४३.५ मण कमी होऊन किमतीच्या मानानेंही प्रमाण शेकडा ५१.६ रुपयांचा माल बाहेर गांवीं कमी पाठविण्यांत आला. सन १८८२–८३ सालीं ३,४५,२६,७९९ रुपयांचा ४४,०२,५१० मण माल बाहेर गांवीं पाठविला गेला असून ह्या सालांत २४६२२४३३ रुपयांचा २९९०८५७ मण माल वऱ्हाडांतून बाहेर गेला. ह्या मानाने पाहिलें असतां एकंदर बाहेर पाठविलेला माल शेकडा ३२ मण कमी होऊन त्याचे किमतीचें प्रमाण शेकडा २८.६ रुपयांनीं कमी झालें आहे.

रलवेच्या योगानें जो व्यापार चालतो तो पश्चिमेकडे मुंबईशीं व पूर्वे कडेस मध्य प्रांताशीं चालतो. ह्या रिपर्टाचे सालांत मुंबई कडून २६२८१६८ रुपयांचा ६८-४२७ मण माल कमी आला व ८०४३-४०१ रुपयांचा १३१५४१४ मण माल बाहेरगांवीं वऱ्हाडांतून कमी पाठविण्यांत आला. गुदस्त सालापेक्षां ह्या सालांत १४१४९६ मण माल मध्य प्रांतांतून इकडे अधीक आला पण एकंदरीत १८६४-७४ रुपयांचा माल कमी आला. इकडून मध्य प्रांतीं ह्या सालीं १२७१३ मण माल कमी पाठविण्यांत आला पण एकंदरीनें बा… रुपयांचा माल गुदस्त सालापेक्षां तिकडे अधिक गेला. सन १८८२-८३ सालीं मुंबई कडून १८८४७११२ रुपयांचा १०१४८९६ मण माल व मध्य प्रांतांतून ३६९६९६२ रुपयांचा ५९६२-३० मण माल आला असून ह्या सालांत मुंबई कडून १६२१८९४४ रुपयांचा ९-४६४६९ मण व मध्य प्रांतांतून ३५१०-४८८ रुपयांचा ७३७७२६ मण माल वऱ्हाडांत आला. व सन १८८२-८३ सालांत इकडून मुंबईकडे ३०१११८१४ रुपयांचा ४१६६६३३ मण व मध्य प्रांतांत ५९०४८३ रुपयांचा ४२६३७ मण माल गेला असून ह्या साली मुंबईकडे २२०-६८४१३ रुपयांचा २८५११६९ मण माल व मध्य प्रांतांत ७०४८८१ रुपयांचा २९९२४ मण माल वऱ्हाडांतून पाठविण्यांत आला. जसा इकडील माल मुंबई कडेच अधीक जातो तसा मुंबई कडून ही इकडे बराच येतो. ह्या सालीं तिकडून विलायती व देशी कापड, गोणपाट, रेशमी कापड, लोखंड, अफू मिठ व साखर हे पदार्थ मुख्यत्वें करून इकडे कमी आले. मध्य प्रांतातून आलेल्या मालाचें मान वाढलें आहे त्याचें कारण असें कीं तिकडून कोळसे, हरभरे व मोहो हे पदार्थ इकडे पुष्कळ येऊं लागले आहेत. सन १८७९-८० साला पावेतों जबलपुराकडून ईस्ट इंडिया रेलवेच्या योगानेंच बहुधा हरभरा फार येत होता. आता छत्तिसगड रेलवे सुरू झाल्यापासून तिकडून हरभरा इकडे फार येऊं लागला आहे तो इतकां कीं सन १८८२-८३ सालांत ५९०१८ मण आला असून ह्या सालीं २१६६४० मण आला. मीठ मुंबई कडून जितकें कमी आलें त्या मानानेंच मध्य प्रांतातून ज्यास्त आलें. ह्याचें कारण असेंकीं मुंबई कडे कांहीं कारणां वरून मिठावरील कर वाढवीला होता म्हणून मध्य प्रांतांतून हा माल ह्या सालीं अधीक आला.

कपाशीचें पीक सन १८८२-८३ सालीं दर एकंदरी २ मण १० शेर झालें असून ह्या सालांत १ मण ७ शेर सरकी सुद्धां अथवा सरकी खेरीज दर एकरीं १२ शेर झालें. ह्या मानानें सालांतील एकंदर कापसाचें उत्पन्न ६०८०७७ मण अथवा शेकडा ४९. ७ मण मागील सालापेक्षां कमी झालें. गव्हानें पीक ह्या वर्षीं चांगलें झालें त्याचापेरा. २२३७४२ एकर अधीक होऊन दर एकरीं ५ मण ३८ शेर ह्या मानानें ५७९८७५४ मण गहूं उत्पन्न झालें. परंतु हें पीक फार माग-

सल्यामुळें ह्या रिपोर्टांतील गव्हाच्या व्यापाराच्या संबंधानें हे आंकडे धरले गेले नाहींत. अतिवृष्टीमुळें जवसाचें पीक साधारण आलें होतें; व ह्याचा भाव ही सारखाच राहिल्यामुळें हा माल गुदस्तापेक्षां फार कमी पाठविला गेला.

पुर्वी सांगितलेल्या प्रमाणें गाडी रस्त्याचा व्यापार ही ह्या वर्षी फार मंदावला. सन १८८२-८३ मध्यें ४६१५३६७ रुपयांचा १४९१३२८ मण माल निजाम सरकारच्या प्रांतांतून वऱ्हाडांत आला असून ह्या सालीं २०५७६६६ रूपयांचा ३२३७४६ मण माल वऱ्हाडांत आला तसेंच मागील सालीं एकंदर ३८२४५०२ रुपयांचा १९३२४०चा मालवऱ्हाडांतून तिकडे गेला असून ह्या वर्षी १८४९१३९ रुपयांचा १०९७९४ मण मात्र माल इकडून निजाम सरकारचे राज्यांत गेला.

वऱ्हाडांत लहान मोठ्या यात्रा मिळून एकंदर तीस यात्रा आहेत त्या पैकीं बऱ्याच पुष्कळ दिवस राहून तेथें माणसें बरींच जमा होऊन व्यापाराच्या संबंधानें लक्षावधी रुपयांची घडा मोड होते.

वऱ्हाडांत दळणवळणाच्या सोयी उत्तरोत्तर अधिकाधीक वाढत असल्यामुळें व्यापाराचीच लतकिला होण्याचा विशेष संभव आहे. अकोला व इंगोली ह्यां मधील रेलवे झाल्यावर वऱ्हाड प्रांताचा निजाम सरकाराचे राज्याशीं व्यापार अधीक त्वारीनें चालू होण्याची फार उमेद आहे.

**The Berar Samachar**

MONDAY, December, 8, 1884.

# ADDRESS TO LORD RIPON.

*A* grand meeting assembled at the *A*nglo-Vernacular school to do honour to the retiring Viceroy. Mr. *A*bajee Khanderao, a local pleader, was voted to the chair. Mr. Deorao Vinayek proposed an address. Mr. Vishnu Moreshwar Mahajani seconded the proposal. Mr. Venkatrao Mudholkar proposed and Mr. Salimkhan seconded the adoption of the draft address. The third proposition appointing a sub committee was taken up by *M*r. Rambhau Panhalkar and seconded by Moulvi Abdul Kadar. The last proposition gave the best thanks of the Meeting to the President for his able conduct in the chair. All propositions were carried with acclamation. We have summed up the proceedings of the meeting in a shorter space than would be occupied by an ordinary newspaper advertisement. But the significance of it is not so humble. We may perhaps be accused of not giving the substance of the speeches delivered by the local orators;but, 'we are afraid no sooner it is given, than the tables would be turned upon us in the same breath for repeating the same things that have been said over and over again by hundreds of people. We must therefor eleave the readers rather to imagine the points touched by the speakers than to inflict upon them a perusal of the same. Akola, nay the whole of Berars, must be congratulated for having done its duty by a Viceroy who has done so much for India.

To cut matters short the Viceroy has done nothing more than what a reasonable man should always do. How are then to be accounted for the ebullitions of praise that meet one on every side? How desponding is it to reflect on the situation of things! To say that almost all the former Viceroys failed to do what is expected of the meanest servant of the crown—the most iusignificant of the mob—viz, the doing of ones duty! The position occupied by the great is too eminent to lead one to think that the holder would fail to do what a man of common sense would naturally do. But yes. when the fact becomes known— when it is known too well to be mistaken— one shud... ck with surprise. The difference then between the present Viceroy and all those who preceded him is reduced to the short statement that Lord Ripon has done what a man is bound to do while others have not done it. No wonder therefore that praise weaves its own wreath and puts it round the neck of the object of its devotion. *The* enthusiasm of the people of India springs not from an artificial source but from a living vein in the heart of the earth.

The day before the meeting of *A*kola a crowded meeting was held at Bombay when an address was adopted for presentation to His Excellency The orators of the day *M*essrs *M*ehta, Telang, Mandlik, Dadabhai, Budrudin and others sang in loftier strains the same music that delighted us here the day following. It would be idle to try to give our readers a picturesque description of the proceedings which or the like of which they have been hearing and reading so long and with such repeatedness. It may be noted however that the Bombay meeting was a thorough success. Our request to Lord Ripon is on the eve of his departure for England, to take the same keen and sincere interest in Indian matters that he has taken while representing the Queen. If we could but get only a few of such men as Lord Ripon in England to view Indian questions in the same light in which the best educated natives of India view them the desire to see Indians in *P*arliament which is now so strong and vigoous, will lose much of its vitality and eagerness. If it expresses itself it will do so not on the ground of immediate blessings but on that of future permanent advantages. *P*eople will not feel the exclusion so bitteryl as they do now. Only the more intelligent will recognise it. The generality of public will be satisfied if they know that India occupies one of the oremost places in the discussions carried on in Parliament. By the *B*ye we feel sure Lord Ripon will never forget the people of India as he bears a truly catholic heart; but the consciousness of our wants stares us so roughly in the face, that the mind never rests until it has been fully convinced of the attainment of relief. In short the entreaties we make show no want of confidence in our illustrious viceroy but the manifest urgency of the necessities of the people.

---

It is rumoured that Mr. Cordery *R*esident at *H*yderabad, succeeds Mr. Elliot as Chief Commissioner of the *C*entral *P*rovinces, and that Mr. Henvey, Commissioner of the *B*erars, will be appointed to the *H*yderabad Residency.

# REPORT ON PUBLIC INSTRUCTION H A D. 1883-84

( continued from the 10th November.)

The first feature noticeable in the Report is the number of unfavorable circumstances that combined to prevent the increase in the number of students.

The Educational *C*onference having directed that primary Education should be spread to an extent than it is now, it is to be hoped that many schools will be opened in *B*erar, chiefly in the villages. It was understood until lately that only a certain sum was to be spent on primary Education; but the restriction being removed the *D*epartment will be able to extend primary Education, at least to some of the villages out of the 850 that exist now without schools. With the promulgation of the Local-self—Government scheme, a measure like the extension of primary Education was very necessary, and it is a happy coincidence that the need for it and the recommendation for its adoption should come together.

The indigenous Schools have lessened in number during the year under report. When the Government schools were first established in the villages there were rival indigenous Schools in many of them. Gradually the latter were absorbed in the Government Schools, the masters there being enlisted in Government service as assistants. This method was adopted when the indigenous schools could not be put down in any other way. Thus it will appear that a repressive policy was first adopted with regard to those schools. Many indigenous schools *t*hus dwindled into nothing and even the few that remained, were in a condition that looked far worse than the Government schools to which people naturally compared them. For some days to come, the number of these schools must diminish in Berar, in obedience to the well-known law ' survival of the fittest' and it will take a number of years before fresher and more agreeable types of schools grow up. It cannot be so soon expected that people will be found to take up schools under their charge and conduct them as individual concerns.

The Female Education is increasing. In this as in other problems involving social considerations we must look to Time as the great reformer. The impulse must receive the aid of every leader of society, and through the odium of sending girls to schools must be borne for some time to come by their parents, the very fact of the leaders of the society sending their girls to school will help the cause a great deal.

The system of giving special rewards to lower teachers, has 'stimulated them to greater exertion.' *N*o doubt it was very desirable to have some such incentive to work; and no doubt the measure will meet the present requirements. When teachers have to begin life as assistants on such miserable pays, and have to stay for years before they get appreciable promotions, they are not expected to work with very great zeal. Now that they can look forward to get their rewards proportionately to the labour they spend on the boys under them, it may safely be calculated that decidedly superior results will follow than those of the previous non-stimulant years.

*A*s regards the pay of the teachers, Mr. *D*andekar is quoted in paragraph 55 of the *R*eport. It will be admitted that the fact, because it comes from Mr. Dandekar, has not any superior sanctity as a saying of Manu, or some equally old sage of yore; the fact stands as it is. It cannot be gainsaid that the Department will lose a good deal of its influence, so essential in conducting village schools, when people see the miserable pittance that is doled out to the so-called officers of the Department. We need not say that we condemn the system and that therefore we heartily like the spirit of the remarks of the Secretary for *B*erar in para 6 of the *R*esolution. The whole argument condensed in para 55 evidently depends upon a small peg at the end of it viz, 'as long as efficiency is secured.' How is it possible to secure small pays and efficiency both? It is not in the nature of things that we should find them together.

The officiating Director is pleased to note in para 60 of his report the indirect aids to education. We should think that the way in which some of the gentlemen are concerned have received those very liberal 'aids' from *G*overnment, is not very complimentary to their merits; however as something is always better than nothing, it is happy to see that something is done for the educated people and that they are not entirely neglected. Under this paragraph we almost expected to see the 'drawbacks' to Education, along with the 'aids;' the strictness of the Legal practitioners' rules in Berar, which we took notice of in one of our previous issues, might certainly have appeared under this para with becoming propriety. We are sure it was purely out of mistake that the fact was not noticed in the *R*eport where it must have carried necessarily great weight. We are sometimes inclined to think that Newspapers in Berar are not very serious things in the hands of the responsible officials; but certainly this could not be said of a *R*eport

by the head of a Department of Government.

Merit is looked upon as a test for promotion in the Department. Paras 30 and 45 will make clear our meaning. But we must add that is too slippery a ground to be relied upon at all times; recent instances exemplify our statement.

It is a matter of complaint for some of the highly-paid people in the Department that they have not received any promotions for many years past. As the scope of the Department is so unlimited, it cannot be much blamed for the omission; but on the other hand, it may be as well to state that something could be done for them.

## Correspondence

To,

The Editor "Berar Samachar"
Akola.

Sir,

Mr. Malbari's two notes on 'Infant Marriages and Enforced Widowhood' have created a very hot discussion among some of the Papers, but one is apt to feel surprised when he sees none of your Berar papers taking up the subject as they ought to have done. However it may be, I beg to be permitted to have this my humble say on the subject placed before the public and hope you will not disappoint me.

There are different opinions on the point as to what extent the evils described by Mr Malbari really exist and some are of opinion that they have been greatly exaggerated by him. They may have been so, but it is a point beyond our consideration. What we have to do is with their existence and not with their exaggeration. As far as I know their existence is generally admitted on all sides. Then why not try to remove them as they *are*, instead of abusing Mr Malbari for a fault which was not his own? Everybody knows that Mr Malbari is not a member of the *Hindu* caste and as such it is but natural that he should have been mistaken in judging of the extent to which these evils exist. They may be in a less or a greater form, but still they are evils; and as such we must try to extirpate them as much as possible.

In advocating Government interference as a remedy for the said evils. I think Mr Malbari has not given the subject that consideration which he ought to have done. Of all things religion has a very firm grasp on the human mind and be it full of absurdities anti-scientific principles, obnoxious customs a superstitious mind will ever stick to it; and in dealing with their subjects a good Government should never hurt their religious feelings even if it be with the best of intentions. If the Government were now to compel the orthodox community to do something against their religion no doubt but by so doing it would sow the seed of discontent in their minds and the fruit which it will produce can better be imagined than described. Non-interference with the religion of the country is one of the huge pillars on which the stability of the British Government now rests and shall ever rest and therefore it would be the best policy for the Government to let alone reforms like these and to let the people bring them about themselves. The only remedy by which reforms like these can be brought about is education. The progress of education will be the best means for opening the eyes of the people to the defects in their social customs etc. and when they will once percieve them they shall never be backward in removing them. The proof of this assertion can be easily found in the fact that we are much better now than what we were fifty years ago. So Mr Malbari may rest assured that reforms like these will be gradually brought about by the best and safest of the remedies, viz, the extension of education among both males and females. I may also add here that this reform will be more effective and lasting than the one brought about by Government interference.

In conclusion I cannot but express my heartfelt regret at the way in which some of the Poona papers are treating Mr Malbari. Far from sympathizing with him in the noble work that he has undertaken they are trying to discourage him. In my opinion he is a man who deserves the heartfelt gratitude of the whole Hindu caste and when we consider that, he not being a member of our own caste is exerting himself so much for our welfare, the feeling with which we ought to regard him amounts to something like veneration. Oh! if we but had a few of such Malabaries amongst ourselves!

Yours &
D.

Yeotmal.
2nd December 1884

*N. B We have dealt with the subject and given Mr Malbari his due long before this. As it is possible his suggestions might lead to an enactment, we have made room for the above*

## वऱ्हाड

निजाम सरकार तर्फे लार्ड रिपन साहेबांस मानपत्र देण्याकारितां हैदराबादेहून डेपुटेशन कलकत्यास रवाना झालें व त्या वरील उत्तर फार मार्मिक होतें.

हैदराबादस मोहरमच्या दंग्याची चौकशी करण्याकारितां बसलेल्या कमिशनचें काम संपलें व त्यांनकडून दिवाण साहेबाकडे त्याबद्दलचा रिपोर्ट ही पाठविण्यांत आला. नंतर दिवाण साहेब व सुलतान नवाजजंग बहादूर यांच्या मध्यें बराच पत्रव्यवहार चालला होता व त्यांत कमिशनच्या रिपोर्टावर कांहीं म्हणणें असल्यास स्वतः मुलाकतीस येण्याविषयीं दिवाण साहेबांनीं नवाबास कळविलें असून नवाबांनी स्वतः जाण्याचें नाकारिल्याचें कळतें.

आम्हांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे एल. एल. बी. च्या परीक्षेंत पसार झाले.

कर्नेल फिटझरल्ड व डाक्टर नंदी यांच्या स्वाऱ्या अकोट कडे आहेत. यांस अकोटास रा. रा. देवराव जयकृष्ण यांनीं एक खाशी मेजवानी दिल्याचें समजतें.

'क्ष'— नांदगांव काजी— स्थल संकोचास्तव या अंकीं घेतां येत नाहीं.

'प्रेमेच्छु क्ष'— खरी सही नाहीं. त्या शिवाय कांहीं एक विचार करितां येत नाहीं.

'समूल पुराणार्थ प्रकाश' नांवाचें मासिक पुस्तक गेल्या कार्तीक महिन्या पासून मुंबईस निघूं लागलें आहे. याचा साचा प्रसिद्ध 'विविधज्ञानविस्तारा' एवढा असून पृष्टें सुमारें २२ असतात. टपाल हांशीला सह वर्षाची वर्गणी रु० ३ आ० ६ आहे नांवा वरूनच या पुस्तकांत येणारा विषय स्पष्ट होतो त्या अर्थी विशेष लिहिणें नको. पुराणें [illegible] सिद्धीस आणण्या हा उद्योग फार स्तुत्य आहे व हा सतत चालो असें आम्ही इच्छितों.

येथिल ट्रेझरी आफिसर मि. बर्न्स सायांनीं रजेवरून परत येऊन गेल्या आठवड्यांत आपले कामाचा चार्ज घेतला. आणि मि. मारदेसर हे तहसीलदाराच्या व मि. शापूरजी हे नाझरच्या जागीं परत गेले.

तारीख २ दिसेंबर रोजीं येथिल लायब्ररींत पुण्याचे वे.शा.सं रा.रा.रघुनाथ शास्त्री शेंड्ये यांनीं 'आचार' याविषयावर व्याख्यान दिलें. विषय प्रतिपादन चांगलें झालें.

वाशीमचे डेपुटी कमिशनर मे. लाटन साहेब हे रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजूं झाले व आफिशिएटिंग डे. क. मि. नोलिस साहेब हे आठ दिवसांच्या रजेवर मुंबईस जाऊन पुन्हा कालच्या टप्पानें वाशीमास आले. कमिशनच्या जागीं परत गेले.

रा. रा० विनायक रामचंद्र भाटवडेकर डे. ए. इ. हे कालच्या गाडीनें आपले कामीं रुजूं होण्या करितां यवतमाळास रवाना झाले.

मि. हिगिन्स एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर यांची उमरावतीस बदली झाली व ते तारीख १० रोजीं तिकडे जातील.

आम्ही असें एकतों कीं रा. रा. वामनराव भोळे खामगांवचे सब इंजिनिअर यांस आनररी असिस्टंट इंजिनिअर नेमणार आहेत.

मे जुडिशिअल कमिशनर साहेब हे खामगांवास व पोलिस सुपरिन्टेंडन्ट साहेब हे शेगांवास असल्याचें कळतें.

वऱ्हाडाचे डायरेक्टर रावसाहेब श्रीराम भिकाजी जटार हे यवतमाळाकडून कालच्या पाहेटेच्या गाडीनें येथें आले आहेत. व रा. रा. बजाबा रामचंद्र हे खामगांव कडे असल्या विषयीं कळतें.

हिंदुस्थानचे नवीन गव्हरनर जनरल लार्ड डफरिन साहेब हे 'ब्यासम्यानिआ' नांवाच्या आगबोटींतून आज रोजीं दिवसाचे चार वाजतां मुंबईस येतील असें गव्हर्नमेंट ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. आपण खालीं लिहिलेल्या चार ओळीस येते अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

हल्लीं येथील मु. कमेटी करितां नवीन बायलाज ( पोट नियम ) असावेत असें ठरल्यावरून त्याचा [illegible] मसूदा कमेटीनें तयार करून तो छापविला आहे. त्यांत [illegible] कांहीं कमी ज्यास्ती करण्याबद्दल जर कोणास कांहीं सूचना करणें असतील तर त्या. ता. १५ दिसेंबरचे आंत कराव्या असा हुकूम लिहून त्या मसूद्याची एक प्रत ने. ज. लायब्ररी टेबलावर ठेवण्याकरितां पाठविली आहे. ती सहज एके दिवशीं माझे पाहण्यांत आली. ते नियम वाचून पाहतां त्यांत बरेच कमी ज्यास्ती करावें लागेल असें मला वाटतें. परंतु सदर्हूबद्दल वाटाघाट व विचार करून सूचना केल्या पाहिजेत व तसें करण्यास तर दिवस फार थोडे दिले आहेत. हे बायलाज ज्या रितीनें प्रसिद्ध करावयास पाहिजे होते त्या रितीनें केले नाहींत म्हणून कोणास माहीत ही झाले नाहींत. व्हाईस प्रे. सा. स इतकीच सूचना आहे कीं त्यांनीं दिलेली मुदत आणखी ज्यास्त करावी व हल्लीं मसूदा इंग्रजींत आहे तो मराठींत छापवून तो वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध करावा किंवा त्याच्या पुष्कळ प्रती छापवून सर्व लोकांस वाटाव्यात. बायलाज कायमचे होणार आहेत या करितां कमेटीनें ते मंजूर करून घेण्या करितां घाई करूं नये.

हल्लीं नदींत धुण्याची वगैरे मनाई झाल्यामुळें सर्व लोकांस ह्या करितां मासुमशाचे बांधाऱ्या खालीं जावें लागतें. सदरहु ठिकाणीं जाण्या करितां नदीचे किनाऱ्यानें जो रस्ता आहे तो अगदीं वाईट व अरुंद आहे. सदरहु रस्त्यावर अगदीं नदीचे काठाशीं आगरवेशी पासून तो धरणा पर्यंत कुंभारांच्या भट्या लागल्या आहेत त्या मुळें जाणारा येणारास फारच त्रास सोसावा लागतो व त्याची दुर्गंधी ही सुटते. आगरवेशीचे बाहेरचे रस्त्यावर मोठ्या नालीचे घाणेरडें पाणी सोडल्यामुळे रोज अतिशय दुर्गंधी सुटते. कमेटीनें जागजागीं पब्लीक पायखाने बांधले असून खालील बंधाऱ्याचे दोन्ही बाजूस कमेटीचे हद्दींत लोक मैला करितात हे स्यानिटेशनचे मानानें पाहता अगदीं अपाय कारक आहे. करिता वरील दोन्ही गोष्टी कडे आमचे मेहनती व्हाईस प्रेसिडेंट साहेब व कान्सरव्हेन्सी इन्स्पेक्टर हे लक्ष देतील अशी उमेद आहे.

पत्र फार लांबलें करिता पुरें करितों. कळावें हो विनंती.

आकोला ता. ७--१२-८४ } आपला "क्ष"

## वर्तमानसार

नेटिव द्वेष्या इंग्लिशमन पत्रकर्त्यास लार्ड रिपन साहेबांच्या नांवाचा जो जयजयकार चालूं आहे तो सहन होत नाहीं, व आपली लोक इतकी स्तुति करतात हा तोंडपुजेपणा लार्ड रिपनला आवडतो म्हणून व्हाइसराय साहेब नुसते स्तुतिप्रिय आहेत असें या पत्रकर्त्यांनीं म्हटलें आहे. आमच्या बंधूच्या शहाणपणाची व तर्कशास्त्राची तारीफ करावी तितकी थोडी याकरितां आमच्यासारख्या वेड्यांनीं त्यांच्या तोंडीं न लागावें हेंच बरें.

वर्तमानपत्रकर्त्यांना सरकारी कागदपत्र ठण्याविशीं आज बरेच दिवस ओरड आहे, व विशेषतः लार्ड रिपन साहेब [illegible] आल्यापासून त्यांनीं त[illegible] कित्येक वेळां ठरावही केलें आहेत. आमच्या इलाखे सरकारांनीं एक ठराव प्रसिद्ध करून त्यांत सुमारें तेरा किंवा चौदा पत्रांना सरकारी माहिती फुकट दिली जाईल, व बाकीच्यांस सरकारी रिपोर्टांची आठ आणे चार आणे अशीं माफक किंमत ठेवली आहे तर ते विकत घेऊन उपयोग करून घ्यावा असें फर्माविलें आहे. या चौदा पात्रांपैकीं मराठी पत्रें फारच थोडीं आहेत असें कां?

अमूरच्या रशोचायनीज फ्रांटियरवर सुवर्णक्षेत्रें सांपडलीं आहेत. हीं फ्रांटियर पासून चिनई बाजूकडे सुमारें बारा मैलांवर आहेत. ज्ञा०प्र०

राजा सुरेंद्रमोहन टागोर यांनीं देशी वाद्यकलेचा उत्कर्ष करण्याच्या कामीं जे परिश्रम चालविले आहेत ते लक्षांत घेऊन त्यांस महाराणी सरकारानें नैट ही पदवी दिली असें ता. २३ सिनहूच्या आग्र्याच्या तारेवरून कळतें.

मिठाचें उत्पन्न शिवाय करून हिंदुस्थानचें समुद्रावरील व खुष्कीचें कष्टमचें उत्पन्न चालू हिशेबी वर्षाच्या पहिल्या सातमहिन्यांचें ४८,०९,००० रुपये आहे. मागील सालीं तेंच ९८,४६,००० रु. होतें.

कलकत्त्यांत एका व्यापारी मंडळीच्या गृहांत तीन चाकर रात्रीं शेकोटी पेटवून खोली अगदीं बंद करून निजले, यामुळें असा परिणाम झाला कीं आंतील जमिनीवर निजलेला मनुष्य गुदमरून मृत्यु पावला व बाकी दोघे उंचावर निजलेहोते त्यांचीही तीच अवस्था होण्याच्या बेतांत आली होती.

हिंदुस्थानांत आकाशमार्गानें प्रवास करण्याची सोय व्हावी एतदर्थ एक कंपनी होत आहे.

पुणें येथील गायनसमाजाची एक शाखा मद्रास येथें स्थापन करण्याच्या उद्देशानें समाजाचे पुढारी गृहस्थ फंड जमा करण्याच्या खटपटीस लागले आहेत असें समजतें.

पंडित शामजी कृष्णवर्मा हे हल्लीं सकुटुंब विलायतेंत आहेत, त्यांची बारिस्टरची परिक्षा उतरल्याचें कळतें.

अधांतरीं राहाण्याबद्दल बक्षीसः--आधाराशिवाय अंतराळीं राहणारास ९०० रुपये इनाम मिळतील अशी जाहिरात दिल्यामुळें मद्रास येथें एक गृहस्थ भूमीपासून चार फुटी उंचीवर चाळीस मिनिटें पर्यंत राहिला. हें मद्रासचे गव्हरनर साहेबांनीं समक्ष पाहिलें. सु०प०

विजापूर—अद्याप ही परजन्यानें बिलकूल टाळा दिल्यामुळें लोक फार हवाल दिल झाले. पिकें बहुतेक करपून जात आहेत. थंडीचा ताप कांहींच नाहीं म्हटलें तरी चालेल. रोगराई म्हणण्यासारखीं नाहीं. धारणे नें मान फारच चढलें जोंधळे ८।८॥ शेरांवर आलें. काय होईल तें पहावें.

नेक नामदार लार्ड रिपन यांचें येथें स्मारक करावें अशा बद्दल विजापुरास एक जंगीं सभा भरली होती. आंकडे कांहीं पडले व बाकी काम चालूं आहे म्हणून समजतें. मे. एस. टागोर साहेब यांचा ही आधार मिळाला आहे. रामदास.

आस्ट्रेलियाचे पश्चिम किनाऱ्यावर ३१० ग्रेन वजनाचें एक मोतीं सांपडलें आहे त्याची किंमत १०००० रु० आहे.

गारुडी चमत्कार— विलायतेंत गेल्या महिन्याचे २९ वे तारखेस एका ठिकाणीं गारुडी चमत्कारांचा खेळ झाला. त्या खेळास इंग्लंडचे मुख्य प्रधान नाम. ग्लाडस्टोन साहेब हे गेले होते. त्या वेळीं फारच चमत्कारिक देखावे दिसून आले. गारुड्यांच्या एका स्लेट पाटीवर खुद्द ग्लाडस्टोन साहेबांनीं स्वहस्तें चालू राजकीय विषयां संबंधीं कांहीं प्रश्न फ्रेंच, स्पानिश आणि इंग्रजी भाषेंत लिहिले व ती स्लेट एकापेटींत बंद करून व तिला कुलूप ठोकून ग्यास लैटचे उजेडांत एका टेबलावर ठेविली थोड्या वेळानें स्लेटीवर लिहित असल्या सारखा आवाज ऐकूं येऊं लागला, व मग ती स्लेटपाटी कुलपांतून काढून पाहतात तों ग्लाडस्टोन साहेबांच्या प्रश्नाच जबाब चक्क खासे ती वर लिहिलेले दिसले!! शु०सू०

नेटिव राजांच्या फौजा कमी करण्याच्या संबंधानें जे लेख विलायतेच्या टाइम्स पत्रांत प्रसिद्ध झाले ते पुरी माहिती नसणाऱ्याच्या हातून लिहिले गेले असें अता बाहेर आलें आहे.

झोबप्रकरण— इंग्रज मुख्य कामदारानें झोब व दुसरे लोक यांचा एक बडा दरबार करून त्यांची समजूत केली व त्यावरून ते बहुयेक लोक चांगले खुष झाले. आतां या स्वारीचें काम बहुयेक आटोपल्या सारखें झालें.

इजिप्त प्रकरण— इजिप्त संबंधाच्या कौसलांत आपणास येण्याचा हक्क आहे असें जर्मनी व राशिया यांचें म्हणणें आहे.

मद्रास शहराच्या पाण्याचा संचय फुटून वाहून गेला त्यांत ३९ माणसें मेलीं व १,००० जनावरें मेलीं.

कारवारच्या लोकांनीं लार्ड रीपन यांस मानपत्र देण्याचें ठरविलें व त्यांच्या आठवणीकरतां रीपन नांवाची एक सभा स्थापून ती दरसाल ३१ मे रोजीं भरण्याचें ठरविलें.

चालू हिशेबी वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत हिंदुस्थानांत कस्टमची जमा ४८,०९,००० रुपये झाली व मागच्या वर्षाच्या त्याच मुदतींत ९८,४६,००० झाली होती.

लार्ड डफरीन हे हिंदुस्थानांत येण्यास निघण्यापुर्वी हिंदुस्थानची माहिती वगैरे मिळविण्या करतां माहितगार अशा लोकांच्या भेटी घेत होते.

अफगान सरहद्द कमिशन हेरातेपासून आठ कोसांवर पोंचलें

हिंदुस्थानसरकारच्या सेक्रेटरी हपीसांत खालच्या पतीच्या ३० जागा भरावयाच्या असून त्यांच्या करतां येत्या जानेवारीच्या १३ व्या तारखेस कलकत्ता, अलहाबाद व लाहोर येथें परिक्षा होणार आहेत!

पेशावर येथील दोन्ही किल्ले लष्करी खात्यांतून काढून सिविल खात्याकडे देण्यांत येणार. ठा०म०

## Epitome of News

A deputation consisting of the Nawab *Nizam* Yar Jung, *Rajah* Shevraj Bahadur, and Syed Hossain Bilgrami left for Calcutta on November 29, to present a farewell address to the Viceroy. The address, which is accompanied by a handsome casket, has been largely signed, and is expressive of affection and regard which his Highness's subjects generally entertain towards Lord *Ripon*. The railway station was crowded with people, who had assembled to see the deputation off.

At a meeting of the inhabitants of Ahmedabad held at Nuggur Shett's, it was resolved to present by deputation an address to Lord Ripon at Bombay, and to raise a fund for erecting a public hall to perpetuate his Lordship's name in Ahmedabad.

The *Indian Mirror* publishes the following letter of invitation from the Honorary *S*ecretary to the Greenwich Liberal Association to *Mr. L*almohun *G*hose:—

BOROUGH OF GREENWICH LIBERAL ASSOCIATION.

Tudor *House*, Greenwich, 5th November, 1884.

My dear Sir,— I have the honour to convey to you the following resolution which was carried unanimously at a meeting of our Council held last night at the Lecture *Hall*, Greenwich:—

"That a cordial invitation be given to Mr. Lalmohun Ghose to address a meeting of the Five Hundred at an early date with a view of his becoming a canditate for the borough of Greenwich."

In pursuance of this resolution, and on behalf of the Council I have the pleasure to invite you to name a day when it will be convenient to yourself to favour our Five Hundred with an address.- I am, dear Sir, yours faithfully,

R. S. JACKSON, Honorary Secretary

*Lalmohun Ghose*, Esq.

When the mail left, Mr. Ghose had accepted the invitation to address the Five *Hundred*, and it was after that address that he was unanimously adopted as a candidate. The *Indian Mirror* says —"The warmest thanks to India are due to the Liberals of Greenwich for the honour they have done us by adopting our gifted countryman as their future representative in the *House* of Commons."

At the meeting held at the Town Hall in *B*ombay it was announced that the sum of *R*s. 60000 had already been subscribed by the native communities of Western India to the fund otthe *R*ipon Technical *C*ollege.

### नोटीस.

चिमणाजी वल्लद रामजी कुणबी राहाणार बाभुळ गांव तालुके बाळापूर यास खाली सही करणार इजकडून कळविलें जातें कीं, तुम्ही चांगले रितीने वागवीत तर नाहीं, व विनाकारण मजला मार हाण करितोस; या भयामुळें [illegible] आपले बापाचे येथें माहेरी आजमास दहा वर्षें पर्यंत राहिले. व तुमचे नांवावर कर्ज काढून आज पावेतों खाल्लें. व आतां मजला कर्ज ही मिळत नाहीं व मी ही तुमच्या जवळ राहण्यास खुष ही नाहीं; कारण तुम्ही कोणच्या वेळेस माझ्या जिवाचा घात कराल याचा कांहीं एक नेम नाहीं. सबब मी दुसरा घरठाव करिते. कळावें

(सही) भाग्यान मर्द चीमणाजी

हची बांगडी असें.

### नोटीस.

तुकाराम वल्लद रामजी नागपुरे रंगारी रहाणार पातूर शेखबाबु यांस नोटीस देणार ज्यानी मर्द तुकाराम इजकडून नोटीसीने असें कळविलें जातें कीं, तुझें माझें लग्न होऊन आज दहा वर्षें जाहलें. ह्या दहा वर्षांत सहा माहिने तुजपाशी नांदले ह्या सहा महिन्यांत तुजपशी मी रहावें अशा बद्दल कोणचीही गोष्ट अशी नाहीं कीं, मी तुजपाशी राहून घर धंदा करावा आणि मजला असा धाक आहे कीं कोणच्या वेळीं तू माझा घात करशील कोण जाणे. ह्या भयानें मी तुजपासून येऊन आज सुमारें आठ नऊ वर्षें माझे आईचें घरीं येऊन राहिलें. परंतु इतक्या दिवसांत मजला घेऊन जाऊन चार संसारी मनुष्या प्रमाणें तु राहत नाहींस. अशी माझी व माझे आईचा वगैरे पक्की खात्री झाली यावरून तुजला असें कळाविलें जातें कीं मी कांहीं कोणच्या ही रीतिनें तुजपाशी राहण्यास कबूल नाहीं व आज नऊ दहा वर्षांत तुझें नांवावर ४९० रुपये कर्ज काढून मी निर्वाह केला आतां पुढें मजला कोणी कर्जही देत नाहीं. व तुझे जवळ मनला राहणें नाहीं म्हणून तुजला नोटीसीनें कळवितें कीं, नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आत मी तुझें नांवावर जे कर्ज काढलें ते रुपये ४९० द्यावे व माझ्या वरील लग्नाचा हक्क सोडून द्यावा. असे न झाल्यास मी दुसरा घरठाव करील व पोटाचे रुपया बदल सरकारांत काम चालवून भरून घेतलें जाईल व मजवर कोणचेही प्रकारचा हक्क तुझा नाहीं कळावें.

(सही) निशाणी ज्यानी मर्द

तुकारम इचे हातची बांगडी असें.

हेंपत्र आकोला येथें कै०वा० खंडेरा व बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XVIII AKOLA MONDAY DECEMBER 15 1884 NO 48

वर्ष १८ अकोला सोमवार तारीख १५ माहे डिसेंबर सन १८८४ इ० अंक ४८


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु० |
| वर्षाची आगाऊ | ५ |
| सहामाही ,, | ३ |
| साल अखेर | ७ |
| टपालखर्च अंकास | ०४ |
| डांक हांशील. | |
| वर्षाचें आगाऊ | ०१३ |
| सहामाही | ०८ |
| साल अखेर | १०८ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०३ |

## पक्षकार लोकांस फार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी. ए. एल एल, बी, मुंबई हायकोर्डताचे वकील, हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हापीस वऱ्हाडसमाचार छापखान्या शेजारी काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडातील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सुचना आहे.

तारिख९ माहे डिसेंबर सन १८८४. } पत्रकर्ते

वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष वद्य १३ शके १८०६

## बाल विवाह.

बालविवाह व वैधव्य या विषयांवर मि. मलबारी यांनीं चर्चा करून मोठमोठाल्या लोकांची मतें मागविली व ती प्रगटही केली. यामुळें याविषयास पुष्कळ महत्व आलें आहे अशा कृपा बद्दल शेठ मलबारी यांचे आभार मानावे तितके थोडेच यांत संशय नाहीं. पण आतां तीगोष्ट हिंदुस्थान सरकार पर्यंत जाऊन तेथून स्थानीक सरकारा कडे दरऐक हिंदु वर्गातील लोकांचे याजबद्दल कसें काय मत आहे याचा खुलासा होण्या करितां आली आहे. वरचे ग्याझेट पत्रावरून असें समजतें कीं मुंबई सरकारनें प्रत्येक जातींतील शिष्ट मंडळीस पत्र धाडून त्यांचे अभिप्राय मागविले आहेत. हे अनुकूळ पडतील तर बाल विवाह संबंधानें कायदा होण्याचा फार संभव आहे. आमचे असें मत आहे कीं इंग्रजसरकारांनीं दयाळू होऊन अम्हास विद्यामृत पाजिलें व पाजित आहेत त्याजबद्दल आम्ही त्यांचे फार अभारी आहोंत. आतां त्यांनीं मेहेरबानीं करून आमच्या सामाजिक रचनेंत हात घालूं नये यांतच त्यांचे भूषण आहे. एक मोठी तलवार त्यांनीं आमचे हातीं दिलीच आहे. तिच्या अंगात इतके गुण आहेत कीं ती सर्व कामें जशीं व्हावीं तशीं करूं शकेल. पण जर करितां ते दुसरें शस्त्र देतील तर तें आपलें काम तसेंच बजावील किंवा नाहीं याचा फार संशय वाटतो. शिवाय त्याची जरूर ही नाहीं जर कदाचित् आमचे लोकांस त्याज पासून फायदा होईल असें वाटत असेल तर त्यांनीं दिलेल्या शस्त्रापासून तो फायदा खास होऊं शकणार नाहीं अशी खात्री करून घेतल्या शिवाय दुसरें शस्त्र मागून घेऊं नये अशी त्यांत आमची सविनय प्रार्थना आहे. विद्येच्या योगानें लोकांस बालविवाह करणें हें निंद्य आहे व यांत आपलें हित नाहीं असें वाटूं लागलें म्हणजे लोक तो रीत सहजच झुगारून देतील. संशय झाली असल्या कारणानें एकदम ती त्यांच्यानें मोडवणार नाहीं हें तर खरेंच पण ही केवळ कमी जास्ती काळाची शंका उरली व असें न होऊं देण्या बद्दल लोकांनीं कायद्या खेरीज अन्य तऱ्हेनें खटपट करावी असें आमचे ही पण म्हणणें आहे. कायदा करून घेतल्यानंतर त्या पासून पीडा होऊं लागल्यास तो बंद होण्याची ही अत्यंत पंचाईत पडेल याज करितां तो मागण्याचे अगोदर सर्व विचार झाले पाहिजेत. इतर राष्ट्रा मध्यें असें कायदे होते कीं काय, ते अंमलात येत होते तेथें लोकांचे त्याज विषयीं कसें काय मत झालें; तीच स्थिति आपणास लागूं पडेल किंवा नाहीं, आजपर्यंत आपल्या सामाजिक रचनेचा झोंक कसा होता, तो कोणत्या तऱ्हेनें बदलत गेला व सध्यांच्या युक्तीनें त्यास काय अवस्था प्राप्त होईल या सर्व गोष्टींचा व अशाच प्रकारच्या इतर गोष्टी विषयीं पूर्ण विचार झाला पाहिजे. केवळ विद्येच्या योगानें व स्त्रियांस ज्ञान प्राप्त झाल्यानें जो फायदा होणार आहे त्याचा विचार केला पाहिजे. आज स्त्रियांत इंग्रजी शिकवून इतर तऱ्हेनें स्त्रियांच्या विद्येकडे लक्ष देण्याचा सध्यां खटाटोप सुरू आहे. गेल्या समारंभांत या विद्यावृद्धीस बराच टेका पुणें येथें मिळाला आहे. जर करितां ही कल्पना शेवटास जाईल तर आमचे गृहांस्थतींत फारच मोठा फरक पडेल यांत संदेह नाहीं; व ही कल्पना थोड्या बहुत कालांत शेवटास जाईल असें चालूं स्थितींत मानण्यास कांहीं हरकत नाहीं. तर स्त्रियांची स्थिति पालटल्या वर बालविवाहाचे संबंधानें मोठा फरक पडेल असें आम्हास वाटूं लागलें आहे. ज्याप्रमाणें नवऱ्यास वाटतें त्याच प्रमाणें बायकोस वाटूं लागलें म्हणजे मुलीचे अगर मुलाचें लवकर लग्न करण्याचा प्रघात सहजच कमी होईल. या करितां हें ज्ञान त्यांस मिळावें याच खटपटींत सरकार व लोक आपली अक्कल खर्च करितील तर त्यापासून अती फायदा होईल. जितकें लवकर स्त्रियांस पुरुषां प्रमाणें वाटूं लागेल कीं लहानपणीं लग्न करण्या पासून फार तोटा आहे तितकें लवकर ही चाल बंद होण्याकडे आपोआप यश येईल. सध्यां पुरुषांस ही चाल निंद्य वाटून बायकांचे अडाणी समजुती मुळेंच विशेषतः त्यांस आपलें वाटणें एकीकडे ठेवावें लागतें. तर तो अडथळा दूर झाला म्हणजे एकदम पुरुषांचे सर्व विचारांस दुपटीहून अधिक जोर येऊं लागेल. कारण यांचे विचर त्यांच्या शहाण्या व विचारशील बायकांचे हातून परिपूर्ण तऱ्हेनें अमलांत येतील. आतां स्त्रियांस शिक्षण कोणत्या तऱ्हेचें असावें म्हणजे त्या पासून हा फायदा होईल हा प्रश्न निराळा आहे व त्या संबंधानें आज लिहिण्याचा आमचा हेतु नाहीं पण इतकी गोष्ट खचित आहे कीं जर स्त्रियांचें शिक्षण रितीचे बाहेर गेलें व असावें त्या पेक्षां फाजिल झालें तर त्या पासून सध्यां जे तोटे आहेत त्यापेक्षां ही वाईट परिणाम होतील हें निःसंशय आहे. याकरितां कायदा करण्याचा विचार सोडून स्त्रीशिक्षण कोणत्या पद्धतीचें असावें याचा पूर्ण विचार करून ठरवावें व त्याच प्रमाणें स्त्रियांस तें ठरीव शिक्षण द्यावें म्हणजे कोणत्याही तऱ्हेनें नुकसान नहोतां उलट फायदा होईल असा आमचा समज आहे.

## लार्ड डफरिन्.

आमचे नवीन गव्हर्नर जनरल लार्ड डफरिन साहेब ह्यांनीं तारीख ८ माहे मजकूर रोजीं साडे चार वाजतां ह्या देशाच्या किनाऱ्यावर मुंबई बंदरीं पहिल्यानें पाय ठेविला. लार्ड साहेब ज्या ठिकाणीं उतरले त्या ठिकाणीं पुष्कळ द्रव्य खर्चून जागा सुशोभित केली होती. लार्ड साहेबांना स्वागत करण्या करितां मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जेम्स फरग्युसन आले होते. मुंबईचे म्युनिसिपल कारपोरेशन म्हणजे तेथील म्युनिसिपालिटीचे सभासद यांच्या करितां नेमलेल्या जागीं हे सर्व गृहस्थ हजर होते. सभा स्थानीं लार्ड साहेब येऊन दाखल झाल्यावर म्युनिसिपल कारपोरेशनचे अध्यक्ष मिस्तर फेरोजशा एम मेथा मुंबईतील प्रसिद्ध पार्शी बारिस्टर यांणीं म्युनिसिपाल कमेटीच्या वतीनें आड्रेस वाचला. हा आड्रेस मोठ्या मेहनतीनें तयार केलेला असून मोठा खुबीदार होता. कानडा प्रांताची राजसुत्रें ह्यांच्या हातांत असतां लाट साहेबांनीं आपल्या राजकार्य धुरंधरतेनें आणि मुत्सद्दीपणनें जें यश मिळविलें त्याबद्दल या आड्रेसाच्या आरंभीं लाट साहेबांची यथाप्रसंग योग्य स्तुति करून नंतर या देशांत येणाऱ्या गव्हर्नर जनरल आणि व्हाइसराय याणें ह्या देशांतील अनेक धर्माच्या असंख्य प्रजेच्या हिता करितां काय केलें पाहिजे याचें थोडक्यांत परंतु चांगल्या प्रकारानें दिग्दर्शन केलें आहे. या दिग्दर्शनांत सुचविलेल्या सर्व गोष्टी महत्त्वांच्या आहेत परंतु त्यांतून ही अति महत्वाच्या एक दोन गोष्टी लाट साहेबांच्या कानावर घालण्याची ही उत्तम संधी मुंबईच्या म्युनिसिपलिटीनें जाऊं दिली नाहीं या बद्दल त्या मंडळीची तारिफ करणें योग्य आहे. इतके दिवस पर्यंत गव्हर्नर जनरल साहेब म्हटले म्हणजे कोण हें फक्त कलकत्ता इलाख्यांतील लोकांत माहीत होतें. इतर दोन्ही इलाख्यांतील लोकांस त्यांची माहिती काय ती कागद पत्रावरून. खुद्द लाट साहेबांचें या राहिलेल्या दोन इलाख्यां विषयीं ज्ञान म्हटलें म्हणजे ही तसेंच. "इलाखाधिपाति" दोन्ही ठिकाणचे गव्हर्नर या नेत्रद्वयांतून जें कांहीं लाट साहेबांच्या सेक्रेटरी साहेबांच्या नजरेस पडेल तेवढें. मुंबई इलाख्याच्या मुख्य शहरीं लाट साहेबाचे जातां येतां कांहीं दिवस जातात हें खरें परंतु इतक्या वर्षांच्या वहिवाटी वरून असें वाटतें कीं ह्या देशांत येतांना पहिल्यानें आणि येथून परत घरीं जातांना शेवटीं; असें दोन वेळीं मुंबईस येण्याचें कारण इतकेंच कीं तसें केल्या शिवाय गत्यंतर नाहीं. गव्हर्नर जनरल साहेब यांची स्वारी मुंबई किंवा मद्रास इलाख्यांत यावयाला म्हणजे तसेंच महत्वाचें कारण असलें पाहिजे. निजाम सरकारा सारख्याला राज्याभिषेक करणें झाल्यास किंवा दुष्काळा सारख्या महत्संकटानें साठ सत्तर लक्ष लोकांच्या जिवावर येऊन बेतल्यास लाट साहेबांच्या मनांत हिमालया वरून ऊष्ण प्रदेशांत यावयाचें कदाचित् येतें. अशा प्रसंगांशिवाय व्हाइसराय साहेबांना आपल्या अढळ पदावरून या दोन इलाख्यांत जाण्याचें मनांत ही येत नाहीं. जों पर्यंत सर्व देशभर आगगाड्या झाल्या नव्हत्या तों पर्यंत स्थलांतर करणें मोठें प्रयासाचें असे परंतु आतां प्रत्येक इलाख्याच्या मुख्य शहराला आगगाडीचे रस्ते होऊन आज सुमारें वीस वीस

वर्षे होत आलीं असतांही लाट साहेबांची ह्या दोन इलाख्यांवर वर लिहिलेल्या महापर्वा शिवाय इतर प्रसंगीं कृपादृष्टी होऊं नये ही मोठी खेदयुक्त आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? अस्तु. ही स्थिती मनांत आणून मुंबईच्या कारपोरेशनच्या मंडळीनें आपल्या आड्रेसांत लाट साहेबांनां असें सुचविलें आहे कीं कलकत्ता इलाख्या प्रमाणेंच मुंबई आणि मद्रास इलाख्यांत ही लाट साहेबानीं येत जात असावें.

त्याच प्रमाणें व्यापाराची वृद्धी होण्याकरितां ह्या देशाच्या प्रत्येक भागांत आगगाडीचे रस्ते होणें अवश्य आहे हें जाणून ती गोष्टही आपल्या आड्रेसाच्या द्वारानें लाटसाहेबांस कारपोरेशननें सुचविली.

तसेंच हल्लीं जिकडून तिकडून सप्रेम आड्रेस घेऊन जाणारे लार्ड रिपन साहेब यांणीं म्युनिसिपल कमिट्यांचें स्वतंत्र पणानें स्थापन होण्या करितां जें बीजारोपण केलें आहे त्या पासून नुकत्याच उत्पन्न झालेल्या म्युनिसिपालिट्यांची वाढ खुंटली न जातां त्यांचें बळ ज्यास्ती होण्या सारखी तजवीज करावी अशी ही आड्रेसांत सूचना आहे.

ह्या आणि ह्या सारख्या इतर पुष्कळ सूचनांनी युक्त अशा आड्रेसाचें वाचन झाल्यावर लाट साहेबानीं त्याचें समर्पक असें उत्तर दिलें. हें उत्तर देतांनां लाट साहेबानीं जें भाषण केलें त्या वरून त्यांच्या अंगीं त्यांचा पूर्वज प्रसिद्ध वक्ता शेरिडान याचे गुण वसत आहेत हें स्पष्ट दिसून आलें.

आम्ही अमुक अमुक कामें करूं किंवा न करूं याविषयीं लाट साहेबानीं आपल्या उत्तरांत कांहीं एक बोलून दाखविलें नाहीं. परंतु ते इतकें मात्र म्हणाले कीं लार्डरिपन साहेबानीं जीं जीं सत्कृत्यें योजिलीं आहेत तीं तीं पुरीं करण्या विषयीं मी झटेन आणि माझ्या कामांत माझ्या कडून कांहीं झालें तरी त्यांत पक्षपात अथवा स्वार्थ याचा वाराही मिळावयाचा नाहीं एवढें मात्र खास आहे.

येणें प्रमाणें समारंभ आटपल्यावर लाट साहेबांची स्वारी गव्हर्नर साहेबां बरोबर त्यांच्या घरीं गेली नवीन लाटसाहेबांनां पहाण्या करितां प्रेक्षकजनांची रस्त्यावर गर्दींच्या गर्दी झाली होती.

एकंदर झालेल्या प्रकारावरून पहातां या लाट साहेबांची कारकीर्द ही पूर्वींच्या लाट साहेबांच्या कारकीर्दीप्रमाणेंच होईल असें जें अनुमान केलें होतें तें बऱ्याच अंशी खरें होईल असें झालेल्या प्रकारावरून वाटतें.

---

ह्या देशांतील आणि त्यांतून ही विशेषें करून दक्षिण प्रांतांतील देवस्थानांतील दैवतें नाना प्रकारच्या ऐश आरामाचा उपभोग घेतात असें ऐकिलें आहे. कलावंतिणींच्या दैवताच्या संस्थानाला नाहींत अशीं देव स्थानें फारच थोडीं निघतील. जेजूरीच्या खंडोबाच्या तैनातींत इतक्या मुरळ्या आहेत कीं प्रसिद्ध कवि गोल्डस्मिथ यांच्या म्हणण्याप्रमाणें लष्करांत स्त्रियांची भरती करणें झाल्यास या मुरळ्यांचीच एक दोन पलटणें सहज होऊं शकतील. खंडोबाच्या सेवेंत जितक्या मुरळ्या आहेत तितक्या स्त्रिया मोठमोठाल्या बादशहांच्या जनानखान्यांत देखील नसतील. दक्षिणेंतील श्रीबालाजींच्या व्यापारा एवढा व्यापार त्या प्रांतांतलि फार थोड्या सावकारांचा असेल. ह्याच स्वारीला प्रातःकाळीं उठलें म्हणजे मुख मार्जनापासून तों रात्रीं सुख शय्येवर जाईपर्यंत मानव प्राण्याच्या शारीरिक सर्व कृतींचें अनुकरण करावें लागतें. असा प्रकार असल्यामुळें मनुष्यें ज्या ज्या लोकांचें अनुकरण करितात त्या त्या लोकांचें अनुकरण देवळांतलि देवांनीं करावें यांत नवल नाहीं आमच्या असें ऐकिवांत आहे कीं वऱ्हाडांतील कित्येक देवांच्या मनांत घोड्यांच्या व गाडवांच्या शर्तीवरून विजयी अश्वाला आणि गर्दभाला बक्षिसें द्यावयाचीं आहेत. ही गोष्ट कितपत खरी असेल कोण जाणें. परंतु एवढें खरें कीं मनुष्य मात्राप्रमाणें स्वसंपादित जिनगीचे जर देवादिक कायद्याप्रमाणें पूर्ण मालक आहेत तर त्यांनीं घोड्याची किंवा गाढवाची शर्यत करून आपल्या खर्चानें गम्मत पाहिली आणि लोकांनां दाखविली तर त्यांत वर्तमान पत्राच्या एडिटरानां टीका करण्याचें कांहीं कारण नाहीं परंतु ह्या देवस्थानांचे वहिवाटदार जर देवाच्या नांवानें मिळालेल्या पैशाचा अपव्यय करीत असले तर ते मात्र आमच्या कायद्यांत येतात. त्यांविषयीं कांहीं लिहिण्याची गरज वाटल्यास पुढील अंकीं पाहूं.

---

वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेला अकरावें वर्ष सरून बारावें वर्ष लागण्याचा समय समीप आला. इतक्या वर्षांत तिची वाढ सालोसाल वाढत चालली आहे हें पाहून आम्हांस फार संतोष वाटतो. ही सभा बाल्यावस्थेत होती तेव्हां पासूनच पुढें तिचा फैलाव बराच मोठा होण्याचीं चिन्हें दिसत होतीं आणि त्याप्रमाणें घडून ही आलें. सुमारें तीन वर्षांपासून तिणें आपलें पाळण्यांतलें नांव टाकून हालींचें नांव धारण केलें हें ही तिच्या दिवसेंदिवस वृद्धी पावत असलेल्या स्थितीचें सूचक आहे. ह्या सभेच्या समारंभास येणाऱ्या श्रोतृजनांची संख्या दरसाल वाढत चालली आहे आणि गेल्या वर्षीं तर त्यांच्या करितां वेगळी जागा तयार करावी लागली या वरून तेथें किती गर्दी होत असते याची कल्पना वाचकांनींच करावी. यंदांच्या सालीं सभेच्या व्यवस्थापकांनीं समारंभाच्या स्थानीं प्रवेश होण्याकरितां लहानशा दराचीं टिकिटें काढलीं आहेत. हीं टिकिटें सभेचे वर्गणिदार आणि सभासद यांशिवाय करून इतर सर्वांकरितां आहेत शाळेंतील मुलांकरितां निम्मे दराचें टिकिट काढलें आहे. या व्यवस्थे मुळें तेथें जाणाऱ्या सर्व लोकांची बसण्याची योग्य व्यवस्था होणार आहे. वर टिकिटें लाविलीं असतां ही नेहमीप्रमाणें समाज जमेल असें त्या सभेच्या व्यवस्था पकांस वाटूं लागलें यावरूनच ती सभा किती उत्तम स्थितींत आहे हें सांगणें नको. टिकिटें लाविलीं असतांही ज्यासभेला लोक जातील अशा सभा या प्रांतांत आणखीं किती असतील बरें!

---

कांहीं मंडळीच्या खटपटीनें उमरावतीस येत्या जानेवारी महिन्यांत नेटिव्ह लोकांच्या घोड्यांच्या शर्यती व्हावयाच्या आहेत.

**The Berar Samachar.**

MONDAY, December, 15, 1884.

## INDIAN LOYALTY MISREPRESENTED.

